नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### ‘दानिशचे प्रेमसंबंध बिघडल्यामुळे इतर नाहक अडकले’

नाशिक (स. गांवकरी) : नाशिकमधील टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसच्या बीपीओमधील महिलांचे लैंगिक शोषण, विनयभंग, मानसिक अत्याचार आणि धार्मिक भावना दुखावण्याच्या प्रकरणात नऊ गुन्हे दाखल झाले आहेत. तर एकूण आठ अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. यात सहा पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. या प्रकरणात आता अटकेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांची बाजू समोर आली आहे. दानिश शेख आणि एका तक्रारदार महिलेचे प्रेमसंबंध बिघडल्यानंतर माझ्या पतीसह इतरांचे आयुष्यही उध्वस्त झाले, अशी खंत अटकेत असलेल्या एका कर्मचाऱ्याच्या पत्नीने व्यक्त केली आहे.

### जलसंपदा मंत्र्यांचे मोठे विधान

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील धरणांमध्ये यंदा मुबलक पाणीसाठा आहे. मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांत मिळून ४७.७२ टक्के म्हणजेच २७३०९.९१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे. अमरावती विभागात सर्वाधिक ५४.३० टक्के, तर पुणे विभागात सर्वात कमी ४२.४२ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षी पावसाळ्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला होता. नोव्हेंबरपर्यंत कमी – अधिक प्रमाणात पाऊस सुरू होता. त्यामुळे बहुतेक सर्व धरण प्रकल्प पूर्णपणे भरले होते. त्यामुळे आजअखेर पाण्याची उपलब्धता चांगली राहिली आहे. गतवर्षा याच दिवशी राज्यात ४१.३३ टक्के पाणीसाठा होता. गतवर्षाच्या तुलनेत पाच टक्के जास्त पाणी धरणांमध्ये शिल्लक आहे.

### नाथबाबा- जोगेश्वरीचा विवाह सोहळा संपन्न

सांगली (स. गांवकरी) : नाथबाबाच्या नावानं चांगभलच्या गजरात सोमवारी खरसुंडी (ता. आटपाडी) येथे जोगेश्वर विवाहानिमित्त सासनकाठी व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सांगली, साताऱ्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेशातील भाविकांनी हजेरी लावली. ४१ अंश सेल्सियस तपमान असतानाही भाविकांच्या उत्साहाला उधाण आले होते. गुलालाच्या लालभडक रंगात न्हालेल्या आणि खोबऱ्याच्या उधळणीत नटलेल्या या चैत्र यात्रेतील सासनकाठी व श्रीनाथ व जोगेश्वरी विवाह सोहळ्यासाठी सुमारे तीन लाखांहून अधिक भाविकांनी उपस्थिती लावली.

### अकोला पुन्हा एकदा सर्वात ‘हॉट’

अकोला (स. गांवकरी) : उन्हाचा पारा चांगलाच वाढत असतांना अकोला शहर पुन्हा एकदा सर्वात ‘हॉट’ ठरले आहे. एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातच अकोला शहराने ४४ अं.से.चा टप्पा गाठला. कालच ४३.८ अं.से. तापमानासह अकोला जगात सर्वाधिक तापमानाचे शहर ठरले होते. आज तापमानात आणखी वाढ नोंदवल्या गेली.दरवर्षी उन्हाळ्यात अकोला जिल्ह्याला तप्त उन्हाचे चटके बसत असतात. उन्हाळ्यात जिल्ह्यातील तापमानात कमालीची वाढ होते. जिल्ह्यात दरवर्षी तापमानाचे नवनवे विक्रम रचले जातात. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला ढगाळ वातावरण होते. वातावरणात बदल झाला होता. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून तप्त उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली. उन्हाच्या तीव्र लाटेत होरपळ होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून अकोला देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. त्यानंतर आज अकोला शहरातील तापमानाने ४४ अं.से.चा टप्पा देखील गाठला.

# १२ अग्निशमन जवानांना राष्ट्रपती पदके

## अग्नीविज्ञान संशोधनासाठी स्वतंत्र संस्थेची राज्यपालांनी सांगितली आवश्यकता



मुंबई : (स. गांवकरी)

राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त मंगळवारी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकभवन मुंबई येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई अग्निशमन दल, एमआयडीसी व महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील १२ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेली राष्ट्रपती पदके समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली.

अग्निशमन सेवा केवळ आग विझविण्यापुरती मर्यादित राहिलेली नसून महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, औद्योगिक संपत्ती आणि सार्वजनिक ठिकाणांचे संरक्षण करणे ही जबाबदारी झाली आहे. स्वयंपाक वायू व रासायनिक आगी, तसेच ई-कार्स आणि इतर विद्युत उपकरणांमधील लिथियम-आयन बॅटरी मुळे आगींच्या घटना घडत आहेत. आग प्रतिबंध, शोध आणि कारणांचे विश्लेषण आदी क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे. बदलत्या परिस्थितीत अग्निशमन कर्मचाऱ्यांचे कौशल्य वर्धन, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा सातत्याने अद्ययावत करणे गरजेचे आहे, असे राज्यपाल यांनी सांगितले. महाराष्ट्रात अग्निशमन सेवांच्या आधुनिकीकरणासाठी १५व्या वित्त आयोगांतर्गत ६१४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी शहरी तसेच ग्रामीण भागात प्रभावी अग्निसुरक्षा सेवा पुरविण्यास निश्चितच मदत करेल, असे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात अग्निविज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्थेची स्थापना करणे अथवा विद्यमान संस्थांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना अग्निसुरक्षा सराव, जनजागृती मोहिमा आणि आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे राज्यपाल म्हणाले. सुरुवातीला महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या जॅकेटला अग्निशमन ध्वजाचे तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दल, औद्योगिक आस्थापना तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी व पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. मुंबई डॉकयार्ड येथे सन १९४४ साली झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी व जवानांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस व सप्ताह पाळला जातो.

### या अधिकाऱ्यांचा सन्मान

राज्यपालांच्या हस्ते मुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी संतोष वारिक, मुंबई अग्निशमन दलाचे उप मुख्य अग्निशमन अधिकारी अनिल परब, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी हरिश्चंद्र रघु शेट्टी, विभागीय अग्निशमन अधिकारी देवेंद्र पाटील, सब ऑफिसर राजाराम कुदळे, सब ऑफिसर अनंत धोत्रे, लिडींग फायरमन किशोर म्हात्रे, लिडींग फायरमन मुरलीधर आंधळे, लिडींग फायरमन मोहन तोसकर, लिडींग फायरमन मुकेश काटे, विभागीय अग्निशमन अधिकारी किशोर घाडीगावकर व वरिष्ठ प्रशिक्षक किरण हत्याळ यांना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले.

# राज्य ‘उडता पंजाब’कडे

मुंबई : (स. गांवकरी)



दहा वर्षांपूर्वी देशात सर्वात जास्त प्रमाणात अंमली पदार्थांची तस्करी होणाऱ्या पंजाबच्या दिशेने राज्याची वाटचाल होत असल्याचे दिसून येते. दहा वर्षांपूर्वी पंजाबमध्ये वर्षाला आठ ते दहा हजार प्रकरणे घडत होती. राज्यात ही संख्या सध्या तीन ते चार हजार प्रकरणांवर आहे. ही तस्करी रोखण्यासाठी राज्य सरकार अनेक उपापयोजना करीत असताना हे लोण अकोला, अमरावती, नागपूर मधील ग्रामीण भागात पोहचले आहे. गोरेगाव येथील नेस्को प्रर्दशन केंद्रात झालेल्या संगीत कार्यक्रमात दोन तरुणांनी अंमली पदार्थांचे अती सेवन केल्याने त्यांचा मृत्यू झाला. मुंबई ही अंमली पदार्थ तस्करीची राजधानी होत आहे. मुंबई नंतर पुण्यात (आयटी क्षेत्र) अंमली पदार्थ सेवनाचे प्रकार वाढले आहेत. नाशिक, संभाजीनगर, नागपूर, या मोठया शहरांबरोबरच नागपूर, अमरावती, अकोला जवळील ग्रामीण भागात अंमली पदार्थ सेवनाच्या घटना उघडीस आलेल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी (२०२४) राज्य पोलिस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने केलेल्या कारवाईत ४ हजार २४९ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. त्या वर्षी १४ हजार २३० आरोपींना अटक करण्यात आली होती. २०२५ मध्ये १५ हजार ९३३ आरोपींना अटक करण्यात आली. ही संख्या दरवर्षी वाढत आहे. आतापर्यंत साडेसात हजार कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील ही तस्करी आणि त्या अनुषंगाने होणारी गुन्हेगारी गांर्भीयाने घेतली आहे. त्यासाठी विविध उपायोजना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले आहे. कोकेन, एमडी, गांजा, यासारख्या अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना मकोका लावण्याची तरतूद एनडीपीएस कायद्यात करण्यात आली आहे. त्यांची संपत्तीही जप्त केली जाणार आहे. तस्करीला मदत करणाऱ्या १७ पोलिसांना आतापर्यंत बडतर्फ करण्यात आले आहे. नायजेरियन व बांगलादेशी नागरीक या तस्करीत आढळून आले आहेत. त्यांना अटक केल्यानंतर तात्काळ हद्दपार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खोकल्याचे औषध घेऊनही नशा केली जाते. त्यासाठी औषध विक्रेत्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. कुरियरने, समाज माध्यमांवर, कॅन्सर पिडीतांकडून अंमली पदार्थांची विक्री केली जात आहे. सध्या बाजारात सिंथेटिक्स अंमली(कृत्रिम अंमली पदार्थ) पदार्थ सर्रास विकले जातात. त्यावर लक्ष ठेवले जात आहे. तरीही राज्यात अंमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे नेस्को प्रकरणानंतर पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

# निर्यातीअभावी उन्हाळी कांद्याचे दर गडगडले

मुंबई : (स. गांवकरी)




आखाती युद्धामुळे विस्कळीत झालेली कांदा निर्यात आणि बिगर आखाती देशांतून फारशी मागणी नसल्यामुळे निर्यातक्षम उन्हाळी कांद्याचे दर निम्म्यावर आले आहेत. निर्यातक्षम कांद्याला सरासरी २००० ते २५०० रुपये प्रति क्विंटल दर अपेक्षित असताना नाशिकमधील प्रमुख बाजार समित्यांमध्ये जेमतेम ९०० ते १३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. नाशिक मधील कांदा उत्पादक पट्ट्यातील उन्हाळी कांद्यांची काढणी वेगाने सुरू आहे, महिनाअखेर काढणी पूर्ण होईल. ऐन काढणीच्या वेळेत उन्हाळी पावसाचा कांद्याला फटका बसला. शेतशिवारात काढलेला कांदा पावसात भिजला. हे नुकसान कमी म्हणून निर्यातक्षम कांदा निर्याती अभावी मातीमोल ठरत आहे. नाशिक परिसरात उत्पादित झालेल्या निर्यातक्षम उन्हाळी कांद्याला सरासरी २००० ते २५०० रुपये प्रति क्विंटल दर मिळतो. पण, यंदा निर्यात विस्कळीत झाल्यामुळे दर्जेदार कांद्याला जेमतेम ९०० ते १३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. नाशिक बाजार समितीत सोमवारी, १३ एप्रिल रोजी उन्हाळी कांद्याला सरासरी ८११ रुपये प्रति क्विंटल, लासलगावमध्ये सरासरी ११५० रुपये, जळगावात सरासरी ९०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. दर्जेदार कांद्यालाही १३०० रुपयांहून जास्त दर मिळत नसल्याची स्थिती आहे. लाल कांद्याचे दर ५०० रुपये क्विंटलवर आहेत.

# उष्णतेच्या लाटांपासून संरक्षणासाठी उष्णता कृती आराखडा जारी!

मुंबई : (स. गांवकरी)

राज्य शासनाने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या रंग-कोडेड उष्णता सतर्कतांच्या अनुषंगाने उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांचे, विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती (एसओपी) जारी केल्या आहेत. उष्णता-संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यासाठी या उपाययोजना उपयुक्त ठरणार असून विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.



या एसओपींचा मुख्य भर १५ उच्च उष्णता जोखमीच्या जिल्ह्यातील बाहेरील अनौपचारिक कामगार, चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगार तसेच उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण आणि वसाहतींवर आहे. लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड हे जिल्हे यामध्ये समाविष्ट आहेत. पहिल्या एसओपीमध्ये रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कामगार, रिक्षाचालक आदी बाहेर काम करणाऱ्या घटकांसाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. आयएमडीच्या पिवळ्या, केशरी आणि लाल सतर्कतांनुसार कामाचे वेळापत्रक बदलणे, पाण्याचे ब्रेक, पाणी बूथ, ओआरएस वितरण, सावली व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यासारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.दुसरी एसओपी चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी असून, उष्णता ताण व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करते. यामध्ये थंड विश्रांती केंद्रे, पाणी पुरवठा, वायुवीजन, कामाचे नियोजन, जॉब रोटेशन, उष्णता आजार ओळख प्रशिक्षण आणि महिला कामगारांसाठी विशेष सुविधा यांचा समावेश आहे.

तिसऱ्या एसओपीमध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माणाचा समावेश असून, तत्काळ, मध्यम व दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांद्वारे घरांची थर्मल सुधारणा, कूल रूफ, हरित क्षेत्रे आणि हवामान-संवेदनशील नियोजन यावर भर देण्यात आला आहे. या तीनही एसओपीमध्ये विभागीय समन्वय, आरोग्य केंद्रे आणि कामगारांच्या अभिप्रायावर आधारित नियमित पुनरावलोकन तसेच अनौपचारिक कामगारांच्या प्रतिनिधित्वावर भर दिला आहे. जिल्हा नियंत्रण कक्ष (१०७७), रुग्णवाहिका (१०८), पोलीस हेल्पलाइन (११२/१००) आणि इतर महत्त्वाचे संपर्क क्रमांकही प्रसारित करण्यात आले आहेत. या एसओपींची जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, म्हाडा, सिडको, स्थानिक स्वराज्य संस्था आदी प्रमुख विभागांच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

उच्च-उष्णता-जोखमीच्या जिल्ह्यांमध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व वसाहती मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सल्ला आहे.या एसओपी तात्काळ, मध्यम-मुदती (१-३ वर्षे) आणि दीर्घ-मुदती अशा तीन-स्तरीय उपाय योजनावर आधारित असून तात्काळ उपाययोजना मध्ये उष्णता जोखीम नकाशा, असुरक्षित गटांचे लक्ष्यीकरण, जनजागृती, थंडी केंद्रे, घरांची कमी खर्चाची थर्मल सुधारणाचा (रिफ्लेक्टिव्ह छप्पर, सावली, वेंटिलेशन)समावेश आहे. मध्यम-मुदती उपायात पीएमएवाय, गृहनिर्माण योजना, बिल्डिंग बाय-लॉज आणि मास्टर प्लॅनमध्ये उष्णता-प्रतिरोधक डिझाइन (कूल रूफ, ग्रीन स्पेस) समाविष्ट करणे तर दीर्घ-

# मोटारसायकल चोरी करणारी टोळी जेरबंद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



अहिल्यानगर जिल्ह्यात वाढलेल्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. मढी यात्रा तसेच इतर ठिकाणांहून मोटारसायकल चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात आले असून, चार आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून १२ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. यासोबतच ७ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी फिर्यादी दत्तात्रय भागवत म्हस्के (वय- २८, रा. रणकईवाडी, ता. पाथर्डी) यांनी ८ मार्च २०२६ रोजी रेणूकाईवाडी परिसरातून त्यांची मोटारसायकल (एसएच १६ सीएल १३६५) चोरीस गेल्याची तक्रार दाखल केली होती. या घटनेवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता.

दरम्यान, जिल्ह्यात वाढत्या चोरीच्या घटनांची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. दि. १२ एप्रिल २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर परिसरात सापळा रचण्यात आला. रेल्वे पुलाजवळ दोन मोटारसायकलवर आलेल्या चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी आपली नावे महेश मारुती कांदळकर, अजय रेवजी कांदळकर, जावेद समद बेग आणि विकास बाळासाहेब जाधव अशी सांगितली.

प्राथमिक चौकशीत आरोपींनी ताब्यातील मोटारसायकली चोरीच्या असल्याची कबुली दिली. पुढील चौकशीत त्यांनी मढी यात्रा, पाथर्डी, देहरे टोलनाका तसेच संगमनेर तालुक्यातील विविध ठिकाणांहून आणखी मोटारसायकली चोरी केल्याचे उघड झाले.

आरोपींकडून एकूण ३ लाख ५३ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १२ मोटारसायकली, ५ मोबाईल फोन आणि चोरीसाठी वापरलेले साहित्य यांचा समावेश आहे.

तपासादरम्यान आरोपींकडून पाथर्डी, संगमनेर आदी पोलीस ठाण्यांतील एकूण ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींना मुद्देमालासह पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या आदेशानुसार सपोनि हरिष भोये, पोसई संदिप मुरकुटे, पोलीस अंमलदार दिपक घाटकर, सुरेश माळी, अतुल लोटके, विष्णु भागवत, फुरकान शेख, बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, रमिजराजा आत्तार, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, भगवान थोरात, योगेश कर्डिले, प्रकाश मांडगे, सोनल भागवत, भगवान धुळे, अरुण मोरे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# साताऱ्यात नवविवाहितेचा १२ व्या दिवशीच मृत्यू

सातारा : (स. गांवकरी)

अवघ्या १२ दिवसांपूर्वी प्रेमविवाह केलेल्या नवविवाहितेचा मृत्यू झाल्याने साताऱ्यात मंगळवारी खळबळ उडाली. मुलीच्या कुटुंबीयांनी घातपातातून तिचा मृत्यू झाल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल केली आहे. रात्री उशिरा या प्रकरणी पतीविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता. भाग्यश्री संजय मोटे (वय २१, मूळ रा. पांढरेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली सध्या रा. विकासनगर, सातारा) असे मृत्यू झालेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत प्राथमिक माहिती अशी, भाग्यश्री ३० मार्च रोजी बेपत्ता झाली होती. या घटनेनंतर त्याच दिवशी राजकुमार लालासो कांबळे (२५, मूळ रा. पुळकोटी, ता. माण, जि. सातारा सध्या रा. विकासनगर, सातारा)- याच्यासोबत भाग्यश्रीचा विवाह झाल्याचे मोटे कुटुंबीयांना समजले. यानंतर राजकुमार कांबळे व मोटे कुटुंबीयांची चर्चा झाली. या चर्चेमध्ये कांबळे कुटुंबीयांनी हुंडा मागितल्याचा आरोप मोटे कुटुंबीयांनी आपल्या तक्रारीत केला आहे. दरम्यान १२ एप्रिल रोजी राजकुमार याने मोटे कुटुंबीयांशी संपर्क करत ‘तुमची मुलगी भाग्यश्री हिला सातारा जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. तुम्ही लवकर या,’ असे सांगितले.



- नातेवाइकांचा घातपाताचा आरोप

मोटे कुटुंबीय साताऱ्यात आल्यानंतर मुलगी भाग्यश्रीचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात आले. या घटनेने ते हादरून गेले. हुंड्यासाठी तिचा छळ झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दिली. रात्री उशिरा या प्रकरणी पतीविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता. आरफळ (ता. सातारा) गावच्या हद्दीत एकाने पत्नीच्या समोर पतीच्या डोक्यात खोरे घालून खून केल्याची घटना घडली. यामध्ये अमर मुगुटराव नलगे (वय ४०, रा. आरफळ ता सातारा) यांचा मृत्यू झाला.



ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री ज्ञानेश्वर बाजगिरे साहेब यांनी ओतूर पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ जुन्नर यांच्या वतीने साहेबांचा दैनिक समर्थ गावकरीची डायरी पेन शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी पत्रकार संघाचे जुन्नर तालुकाप्रमुख नयन डुंबरे, महिला तालुकाध्यक्ष रंजना घोलप, जिल्हा उपाध्यक्ष रवीकुमार भोर,पत्रकार संघाचे संपर्कप्रमुख रवी गजे,उपाध्यक्ष शौकत शेख,दैनिक सकाळ पत्रकार अविनाश घोलप उपस्थित होते.

# राहुल आहेरचे यश इतरांना प्रेरणादायी : काशिनाथ दाते

पारनेर : (स. गांवकरी)

सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ म्हसोबा झाप ता. पारनेर येथील ग्रामस्थांच्या वतीने राहुल भानुदास आहेर व त्याचा बीड येथील सहकारी दिपक देवकर यांची पुणे शहर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य नागरी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या यशस्वी युवकांचा गौरव करताना परिसरातील तरुणाईसाठी हा प्रेरणादायी क्षण ठरला.



या प्रसंगी सह्याद्री ॲकडमीचे संचालक गायकर सर, डुंबरे सर यांच्यासह बाळासाहेब गुंड, बाबुराव पवार, सोपान शेलार, अशोक खैरे, अन्सार पटेल, गोविंद आग्रे, भाऊसाहेब आहेर (सरपंच), बाबाजी दरेकर, रामदास दरेकर, सबाजी आहेर, मच्छिंद्र आहेर, तुकाराम आहेर, जयसिंग आग्रे, विठ्ठल आग्रे, बाबाजी आहेर, पोपट आहेर, भानुदास आहेर, बाळासाहेब आहेर, बबन आहेर, आण्णा आहेर, अशोक आहेर, संजय आहेर, कचरू खैरे, झुंबर दुधवडे, संपत मधे, काशिनाथ दुधवडे यांसह स्थानिक नागरिक व स्थानिक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार दाते सर यांनी राहुल आहेर व दिपक देवकर यांचे तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे, नातेवाईकांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सह्याद्री ॲकडमीचे संचालक गायकर सर, डुंबरे सर यांचे विशेष अभिनंदन केले. "आजच्या स्पर्धेच्या युगात सरकारी नोकऱ्यांच्या संधी मर्यादित असल्या तरी पोलीस खात्यासारख्या क्षेत्रात मिळालेलं यश हे मोठं यश आहे. पारनेर तालुका दुष्काळी असल्याने शिक्षण हाच आपल्या तरुणांसाठी खरा मार्ग आहे."

"संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला असता पारनेर तालुक्यातील युवक विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्यरत असून शिक्षकांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत व्यवसाय करणाऱ्या पारनेरकरांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. सातत्याने भेडसावणारा दुष्काळ हा आपल्या जिद्दीला धार लावणारा ठरला असून हीच आपत्ती आपल्या प्रगतीची इष्टापत्ती ठरली आहे."

या सत्कार समारंभाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, "अशा कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. राहुलच्या यशाचा सन्मान होताना पाहून इथल्या तरुणांमध्येही प्रेरणा निर्माण होईल आणि तेही त्याच्या पावलावर पाऊल ठेवत यश संपादन करतील, असा मला विश्वास आहे."

तसेच त्यांनी भूतकाळातील आठवणींना उजाळा देत सांगितले की, "अलीकडच्या पिढीला फार माहित नसेलही कदाचित पण गेली चाळीस वर्ष राजकारणात - समाजकारणात काम करत असताना या भागात शिक्षणाच्या सुविधा मर्यादित होत्या, त्या निर्माण करण्यावर मी सातत्याने भर दिला. तत्कालीन आमदार स्व. वसंतराव झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पळसपूर, पोखरी, गुरेवाडी या भागांत सुरू केलेल्या शाळांचे आज हे यशस्वी फळ दिसत आहे, याचा मला अभिमान वाटतो."

शेवटी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आवाहन केले की, "फक्त एका यशावर थांबू नका. MPSC, UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे यशाच्या नवनवीन वाटा निर्माण करत तहसिलदार, प्रांताधिकारी, कलेक्टर यांसारख्या उच्च पदांवर पोहोचून समाजासाठी काम करा."

# थोडक्यात पण महत्वाचे




## नायगाव तालुक्यात ५ सिमेंट पाणवठ्यांची उभारणी

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील वनक्षेत्रात उन्हाळ्याच्या कडक झळा वाढू लागल्याने हरिण, काळवीट, वानर, ससे यांसारख्या वन्य प्राण्यांच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न गंभीर बनतो. या पार्श्वभूमीवर वन विभागाने पुढाकार घेत मौजे घुंगराळा, तळबीड व कुंचेली (ता. नायगाव) परिसरात वन्यजीवांसाठी सिमेंटचे पाणवठे उभारून त्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. वन विभागाच्या या उपक्रमामुळे वनक्षेत्रातील प्राण्यांना उन्हाळ्यातही पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध होत असून, हा उपक्रम वन्यजीव संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे. या कामासाठी नांदेड जिल्ह्याच्या उपवनसंरक्षक सौ. मनीषा पाटील तसेच सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू व कँपा) भारत खेळबांडे यांचे मार्गदर्शन लाभले. देगलूर वन परिक्षेत्र अधिकारी रामराव देवकते यांच्या सूचनेनुसार वनपाल संतवाले, वनरक्षक गजानन कोतलवार आणि स्थानिक वनमजूर यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे काम पूर्ण करण्यात आले. वन परिक्षेत्रात एकूण ५ सिमेंट पाणवठ्यांची निर्मिती करण्यात आली असून, त्यामध्ये नियमितपणे टँकरद्वारे पाणी सोडले जात आहे. परिणामी, वन्य प्राणी सुरक्षितपणे पाण्याची तहान भागवू शकत आहेत. वन विभागाच्या या उपक्रमामुळे केवळ प्राण्यांचे प्राण वाचण्यास मदत होत नाही, तर मानवी वस्तीच्या दिशेने होणारी त्यांची भटकंतीही कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत वन विभागाचे कौतुक केले आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यात वन्यजीवांसाठी 'जीवनदायी पाणवठे' ठरत असून, संवर्धनाच्या दिशेने हा एक आदर्श उपक्रम ठरतो आहे.

## नगर- सोलापूर महामार्गावरील हॉटेल मध्ये गेलेल्या तरुणीवर अत्याचार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर - सोलापूर महामार्गावरील नगर तालुक्यातील अंबिलवाडी शिवारात असलेल्या हॉटेल तुळजा भवानी येथे एका २२ वर्षीय तरुणीवर हॉटेल मालकाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात हॉटेल मालक जनार्धन जाधव आणि एका अनोळखी कामगारावर अत्याचार आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ११ एप्रिल रोजी सायंकाळी एका व्यक्तीची चौकशी करण्यासाठी हॉटेलवर गेली होती. त्यावेळी तिथे असलेल्या कामगाराने तिला माहिती न देता हॉटेल मालक जनार्धन जाधव याला बोलावले. जाधव याने पीडितेशी अश्लील भाषेत बोलण्यास सुरुवात केली. महिलेने याला विरोध केला असता, आरोपी कामगाराने तिचा हात धरला आणि मालकाने तोंड दाबून तिला जबरदस्तीने हॉटेलच्या वरील मजल्यावर असलेल्या खोलीत ओढत नेले. खोलीत नेल्यानंतर कामगाराने पीडितेची ओढाताण केली आणि तो बाहेर निघून गेला. त्यानंतर जनार्धन जाधव याने पीडितेच्या असहायतेचा फायदा घेत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. जाताना आरोपीने खोलीला बाहेरून कडी लावून तिला डांबून ठेवले. पीडितेने हिंमत दाखवून खोलीच्या दरवाजाला लाथ मारून तो उघडला आणि खाली आली. मात्र, दोन्ही आरोपींनी तिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. 'जर कोणाला काही सांगितले तर तुला जिवंत मारून टाकू', अशी धमकीही त्यांनी दिली. या घटनेनंतर पीडितेने पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने करत आहेत.

## श्री क्षेत्र ओतूर ते श्री क्षेत्र आळे पायी पालखीचे आयोजन



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील श्री क्षेत्र ओतूर येथील सद्गुरू बाबाजी चैतन्य महाराज, श्री दत्त मंदिर कोळमाथा येथून श्री क्षेत्र आळे येथील रेडेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे चैत्र वद्य एकादशी निमित्त पायी पालखी वारीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी वारीत ह.भ.प. दत्तात्रेय महाराज पावडे, उमेश डुंबरे, देवराम डोके, लक्ष्मण पानसरे, सुनील डुंबरे, आशा डुंबरे यांच्यासह बाबाजी चैतन्य पंढरपूर व आळंदी वारीतील सर्व वारकरी मंडळी सहभागी झाले होते. दत्त मंदिर कोळमाथा, ओतूर ते आळे दरम्यान सर्व वारकऱ्यांना दानशूर भाविक भक्तांकडून फराळ, केळी, पाणी बॉटल, आईस्क्रीम, विविध फळे, राजगिरा चिक्की आदी पदार्थांचे वाटप करण्यात आले. पालखी सकाळी ८ वाजत निघून सर्व कार्यक्रम आटोपून संध्याकाळी माघारी ओतूर याठिकाणी पोहचते. आळे येथील संत ज्ञानेश्वरांच्या रेड्याने समाधी घेतलेले रेडेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर हे एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे. याठिकाणी दरवर्षी चैत्र वद्य एकादशीला मोठी यात्रा आणि विविध धार्मिक कार्यक्रम, जसे की अभिषेक आणि भजन, पार पडतात. संत ज्ञानेश्वरांनी वेद वदवून घेतलेल्या रेड्याने या ठिकाणी माघ वद्य १३ (शके १२१२) रोजी संजीवन समाधी घेतली. चैत्र महिन्याच्या वद्य एकादशीला येथे तीन दिवस मोठी यात्रा भरते. एकादशीच्या दिवशी अभिषेक, यज्ञयाग, भजन, जागर व भारुडे असे कार्यक्रम असतात.

# ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचे निधन

पुणे : (स. गांवकरी)

पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश ज्ञानेश्वर भोईटे (वय ६५) यांचे आज दुपारी सुमारे तीनच्या सुमारास रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक दिलदार, लढाऊ आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. भोईटे हे कोथळे गावच्या पहिल्या लोकनियुक्त सरपंच जयश्री भोईटे यांचे पती होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, मित्रपरिवार आणि पत्रकारिता क्षेत्रातील मोठा परिवार असा विस्तृत आप्तपरिवार आहे. पत्रकार प्रताप भोईटे, जेजुरी देवस्थानचे माजी विश्वस्त धनंजय भोईटे तसेच कोथळेगावचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय भोईटे यांचे ते बंधू होत. प्रकाश भोईटे यांनी पुण्यात पत्रकारिता करताना दैनिक पुढारी आणि दैनिक केसरी या वृत्तपत्रांत काम करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. स्पष्टवक्तेपणा,



समाजाभिमुख दृष्टीकोन आणि लढाऊ बाण्यामुळे ते सहकाऱ्यांमध्ये विशेष लोकप्रिय होते. पुरंदर तालुक्यातील करहे परिसराचा हा सुपुत्र आपल्या दिलदार स्वभावामुळे सर्वांच्या मनात घर करून होता. त्यांच्या अचानक जाण्याने पत्रकारिता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. "दिलदार मित्र हरपला" अशा शब्दांत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रकाश भोईटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी प्रार्थना व्यक्त केली जात आहे.

# १५ एप्रिलपासून उजव्या कालव्यात आंदोलन!

## निळवंडे पाणी प्रश्न पुन्हा पेटणार

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या पाणी प्रश्नावरून पुन्हा एकदा संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शेतकरी व स्थानिक नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या पार्श्वभूमीवर येत्या १५ एप्रिलपासून निळवंडेच्या उजव्या कालव्यात तंबू ठोकून आंदोलनाला सुरुवात करण्यात येणार आहे. पाण्याचे योग्य वाटप, कालव्यांमध्ये वेळेवर पाणी सोडणे तसेच शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत.

यावेळी ज्येष्ठ नेते बाळासाहेब भोर, अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भानूदास तिकांडे, पर्वतराव नाईकवाडी, सुरेश खांडगे, डॉ. अजित नवले, रवींद्र गोरडे, प्रशांत पाटील, आप्पासाहेब आवारी, महेश नवले, शांताराम गजे, भास्कर कानवडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान "पाणी आमच्या हक्काचं आहे, कुणाच्या बापाचं नाही; आमचं पाणी आम्हाला मिळालंच पाहिजे," असा ठाम इशारा संघर्ष समितीने दिला. तसेच पालकमंत्र्यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणीही करण्यात आली. यापूर्वी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला होता, मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.



"धरण व बंधारे आमच्या तालुक्यात, शेती आमची; पण पाणी आमच्या डोळ्यासमोरून वाहून जाते आणि आम्हाला मिळत नाही. अजून किती बळी गेल्यावर आम्हाला न्याय मिळणार?" असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असून प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे या प्रश्नावरून परिसरात पुन्हा तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


# कर्जत तालुका आजी-माजी सैनिक संघटनेची नूतन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी भाऊसाहेब रानमाळ तर सचिवपदी सुनील साळुंके

कर्जत : (स. गांवकरी)

देशसेवेत आपले आयुष्य अर्पण केलेल्या आजी-माजी सैनिकांच्या सन्मान, हक्क आणि कल्याणासाठी कार्यरत असलेल्या कर्जत तालुका आजी-माजी सैनिक संघटनेची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच कर्जत येथील हॉटेल साई येथे उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत संघटनेच्या नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली असून, उपस्थित सर्व सैनिकांनी एकजुटीचा संदेश दिला.





या बैठकीला तालुक्यातील विविध भागांतील आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशासाठी केलेल्या सेवेमुळे एकमेकांशी जोडले गेलेले हे सर्व सैनिक पुन्हा एकदा संघटनेच्या माध्यमातून समाजकार्यात सक्रिय होण्याचा संकल्प व्यक्त करताना दिसून आले. यावेळी अध्यक्षपदी भाऊसाहेब रानमाळ यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास सर्व सदस्यांनी व्यक्त केला. उपाध्यक्षपदी राम सुपेकर, सचिवपदी सुनील साळुंके, सहसचिवपदी जालिंदर जमदाडे, तसेच खजिनदारपदी सुनील भवर यांची निवड करण्यात आली.

तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून सतीश सुपेकर, बाळासाहेब धावडे, शिवांजली खोसे, प्रमोद बनकर, एकनाथ गांगर्डे, भाऊसाहेब आगवन, सुधीर कर्पे, दिलीप धोदाड, भाऊसाहेब सुरवसे आणि राजू तोरडमल यांची निवड करण्यात आली. याशिवाय कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. रामदास पुराणे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे सर्व उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. नूतन अध्यक्ष भाऊसाहेब रानमाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "देशसेवा ही आमची ओळख असून, आता समाजसेवा हीच आमची जबाबदारी आहे. आजी-माजी सैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी, त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रगतीसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत." बैठकीदरम्यान संघटनेच्या आगामी उपक्रमांवर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी शासकीय योजनांची माहिती पोहोचवणे, आरोग्य तपासणी शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान, तसेच पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संघटनेने यापूर्वीही पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून, त्या कार्याची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला. या बैठकीने संघटनेला नवचैतन्य मिळाले असून, कर्जत तालुक्यात आजी-माजी सैनिकांच्या एकजुटीचे आणि सेवाभावाचे नवे पर्व सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# दगडीआंबा सीटवर भाजपमध्येच संघर्ष उफाळला

डांग. गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील वघई तालुका पंचायतच्या दगडआंबा सीटवर भाजपमधील अंतर्गत वाद आता उघड राजकीय संघर्षात बदलला आहे. पक्षाने माजी वघई तालुका पंचायत अध्यक्ष चंदरभाई गावित यांच्या पत्नी वनिताबेन गावित यांना अधिकृत उमेदवारी (मंडेट) दिले असतानाही, याच सीटवर माजी जिल्हा पंचायत अध्यक्षांच्या गटाने डमी उमेदवार उभा केल्यामुळे तणाव शिगेला पोहोचला आहे. आज वघई येथे भाजप जिल्हा संघटनाध्यक्षांच्या उपस्थितीत दोन्ही गट समोरासमोर आले आणि वातावरण अचानक तापले. दोन्ही बाजूंमध्ये जोरदार वादावादी झाली. परिस्थिती इतकी बिघडली की या गोंधळात अधिकृत उमेदवारांच्या पती आणि माजी तालुका पंचायत अध्यक्ष चंदरभाई गावित यांना अचानक आकडी आल्याने त्यांना तातडीने सरकारी



रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. दगडआंबा सीटवर भाजपचेच दोन प्रभावी नेते आमनेसामने आल्याने "एकाच पक्षात दोन गट" अशी स्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही गट आपापल्या उमेदवाराला टिकवण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत. आता १५ एप्रिल रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी या राजकीय लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. शेवटी कोण माघार घेणार आणि कोण ठाम राहणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# उज्ज्वल भविष्यासाठी डिजिटल शिक्षण काळाची गरज : मुख्यमंत्री फडणवीस

## कर्जत - जामखेडमधील १४० शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक साहित्याचे लोकार्पण : सभापती प्रा. राम शिंदे यांचा पुढाकार

मिरजगाव : (स. गांवकरी)

शिक्षणात तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम करणे हे राज्य शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कर्जत - जामखेड तालुक्यातील १४० जिल्हा परिषद शाळांसाठी डिजिटल शैक्षणिक साहित्याचा लोकार्पण सोहळा सोमवारी, दि.१३ रोजी पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जामखेड येथील तापनेश्वर जिल्हा



परिषद शाळेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते. यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, शालेय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्थानिक विकास निधीतून कर्जत व जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या आधुनिकीकरणावर भर दिला आहे. हा प्रकल्प ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणातील दरी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आपल्या अध्यापन कौशल्यात वाढ करावी आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या साधनांच्या उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दर्जेदार शिक्षण मिळणे अधिक सुलभ होणार आहे. दृक्-श्राव्य माध्यमांच्या वापरामुळे वर्गातील शिक्षण प्रक्रिया अधिक संवादात्मक व प्रभावी होईल. त्यामुळे अवघड विषय समजणे सोपे होईल. या आधुनिकीकरणामुळे स्थानिक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहभाग वाढेल आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक गुणवत्तेतील तफावत दूर करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. नवीन डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन शिक्षण प्रक्रिया अधिक रंजक व सुलभ होईल. तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले आत्मबळ वाढवावे, जेणेकरून ते स्पर्धा परीक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत जागतिक स्तरावर आत्मविश्वासाने यश मिळवू शकतील, असा विश्वास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला. शिक्षकांनी डिजिटल साधनांचा केवळ वापर न करता त्या माध्यमातून अध्यापन पद्धतीत मूलभूत बदल घडवून आणावेत. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देत शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त कशी करता येईल, याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## रक्तदान शिबिर उत्सहात संपन्न

जामखेड तालुका (स. गांवकरी) : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जामखेड शहरातील मिलिंद नगर जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिर काल शनिवार (दि. ११ एप्रिल २०२६) रोजी शहरातील मिलिंद नगर येथे उत्साहात पार पडले. या शिबिराची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. या रक्तदान शिबिरासाठी लाईफ लाईन ब्लड बँक तसेच युनिटी हॉस्पिटल यांच्या वतीने आरोग्य तपासणीचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरास जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, नगरसेविका संगीता रामचंद्र भालेराव, नंदा प्रविण होळकर, प्रा. विकी घायतडक, युवा नेते प्रविण होळकर, संतोष गव्हाळे, बौद्धाचार्य अशोक आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंकल घायतडक, उपाध्यक्ष उबेद शेख, सचिव ॲड. बाळासाहेब घोडेस्वार, खजिनदार सुमित भालेराव, सहसचिव विकी कांबळे, सुरज भालेराव, मंगेश घोडेस्वार,राम गायकवाड, अभिषेक सदाफुले, सोहेल अत्तार, अवि ओहोळ, सुशिल राजगुरू, संकेत घायतडक आदींसह सदस्य व मिलिंद नगर मित्र मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या उपक्रमात परिसरातील तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत रक्तदान केले. तसेच अनेकांनी आरोग्य तपासणी शिबिराचाही लाभ घेतला.

## प्रियंका सपकाळे यांचे घवघवित यश



रावेर (स. गांवकरी) : आदिवासी कोळी समाज साठी अभिमानाची बाब प्रियंका अशोक सपकाळे ,अशोक आनंदा सपकाळे मस्कावदकर यांची मुलगी प्रियंका अशोक सपकाळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी राजपत्रित अधिकारी वर्ग एक परीक्षेत उत्तीर्ण होऊन मान मिळवला आहे. महाराष्ट्र भरातून केवळ ४० जागांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती, त्या परीक्षेत ॲड. प्रियंका यांनी न्यायाधीश होण्याचा मान मिळवला आहे. त्या मुळगांव मस्कावद. ता. रावेर. जि. जळगाव. येथील माजी लेखापरीक्षक कै. अशोक आनंदा सपकाळे यांच्या कन्या आहेत, तसेच वसतिगृह निरीक्षक श्री. धनंजय सपकाळे व मस्कावद येथील उपसरपंच तुषार सपकाळे यांच्या भगिनी आहेत. त्यांच्या कौतुकास्पद कामगिरीने त्यांचे रावेर तालुक्यासह संपूर्ण जळगांव जिल्ह्यातून कौतुक केले जात असून , तसेच आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर त्यांनी अभिनंदन केले आहे.




## वसुंधरा अकॅडमीला राष्ट्रीय स्तरावरील शिक्षा अवार्ड पुरस्कार प्राप्त

अकोले (स. गांवकरी) : अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीला शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी सातत्यपूर्ण वचनबद्धतेबद्दल राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार LEAD Group चे CEO व सह-संस्थापक सुमीत मेहता आणि नॅशनल हेड मोहित सूरी यांच्या हस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला. प्रोपेलचे झोनल डायरेक्ट विशाल उधानी व अंकिता वृंदावन यांनी रस्मार्ट क्लासरूम्स, टीव्ही, टॅब च्या साह्याने ॲक्टिव्हिटी बेस्ड अध्ययन अध्यापन, लर्निंग लेड कॉन्फरन्सेस, पेरेंट फीडबॅक सिस्टीम, प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीकडे सातत्यपूर्ण लक्ष या क्रायटेरियांच्या आधारे राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकासाठी वसुंधरा अकॅडमीची निवड केली. शाळेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत उल्लेखनीय वाढ साध्य केली असून शिक्षक विकासावरही विशेष भर दिला आहे. वसुंधरा अकॅडेमी प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण देत सातत्याने नवे मानदंड प्रस्थापित करत आहे. संखेच्या व शाळेच्या वतीने संस्थेच्या कोषाध्यक्षा तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री राजीव देशमुख व उपप्राचार्या राधिका विक्रम नवले यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला. संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, सहसचिव प्राचार्या अल्फोन्सा डी व सर्व पालक वर्ग यांनी वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य, उपप्राचार्य सर्व शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## वसुंधरा अकॅडेमीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न




अकोले (स. गांवकरी) : अभिनव शिक्षण संस्था संचलित 'वसुंधरा अकॅडमी' मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी महामानवाच्या विचारांना उजाळा दिला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाली.अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा वसुंधरा प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांचा हस्ते तसेच, उपप्राचार्या राधिका नवले, इंद्रभान कोल्हाळ , वृषाली शेटे , शोभा नवले, केदार सर यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी आयुष धरणे, हिमांशू गावीत, तनिष्का येलमामे, सिद्धी जाधव, सिद्धी देशमुख, गायत्री देशमुख, रुतिका साबळे, आरोही शेळके, स्वरा धुमाळ, स्वरा तिकंडे, श्रीशा गायकवाड आणि श्लोक तारगे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत महामानवास अभिवादन केले. या उत्सवाचे खास आकर्षण म्हणजे सई पाबळकर, मंजिरी देशमुख आणि निधी लाटणे या विद्यार्थिनींनी 'भीमराया माझा भीमराया' या गीतावर सादर केलेले सुंदर नृत्य. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. सामाजिक शास्त्र विषयाच्या शिक्षिका वृषाली शेटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून दिले व डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावरील महत्त्वाच्या प्रसंगाचे सामूहिक वाचन केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्यांनी सांगितले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ वाचण्यासाठी नसून ते जीवनात अंगीकारण्यासाठी आहेत." त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील 'मूलभूत अधिकार' (Fundamental Rights) आपल्या वहीत लिहून काढून ते समजून घेण्याचे आवाहन केले.

# प्रशिक्षण ठिकाणी सचिवांचा गोंधळ; कारवाईची मागणी जोरात!

- प्रशिक्षण ठिकाणी गोंधळ घालणाऱ्या त्या सचिवांवर कारवाई होणार का?
- निलंबित करणे ही काळाची गरज अन्यथा कर्जत जामखेड भागात बदल्या करा!
- प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करू नये, अन्यथा या प्रकरणाची गांभीर्यता प्रशासनाला कळणार नाही!
- एकाच जागी एकाच ठिकाणी अनेक वर्ष सचिव,कारभाराची चौकशी झाली पाहिजे– सूत्रांची माहिती
- या सर्व सचिवांची तातडीने दखल घेतली नाही तर या भागातील इतर सचिवांना देखील याचा मनस्ताप होणार?





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला हादरा देणारी घटना अहिल्यानगर येथे उघडकीस आली असून, सहकारी संस्थांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात काही सचिवांनी केलेल्या गैरवर्तनामुळे प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. प्रशिक्षणासारख्या शिस्तबद्ध आणि मार्गदर्शक व्यासपीठावरच काही सचिवांनी गोंधळ घालत मद्यधुंद अवस्थेत घोषणाबाजी व अरेरावी केल्याने या घटनेची जिल्हाभर जोरदार चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र व राज्य सरकार ग्रामीण भागातील सहकारी संस्था सक्षम करण्यासाठी सातत्याने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहेत. पारदर्शक कारभार, संगणकीकरण, कर्ज वितरण आणि वसुली प्रक्रियेत सुधारणा यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. मात्र, या प्रशिक्षण कार्यक्रमालाच काही सचिवांनी गांभीर्याने न घेतल्याचे दिसून आले.

प्रशिक्षणासाठी आलेल्या काही सचिवांनी कार्यक्रमात लक्ष न देता बाहेरच वेळ घालवला. काही जण मद्यप्राशन करून आल्याचेही सांगितले जात आहे. "आम्ही जिल्हा बँक चालवतो, आमच्याशिवाय पर्याय नाही" अशा प्रकारची भाषा वापरत त्यांनी घोषणाबाजी केली. एवढेच नव्हे तर एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शिस्त राखण्याबाबत विचारणा केल्यावर संबंधित सचिवांनी थेट अरेरावी करत उद्धटपणाची भाषा वापरली. घटनेदरम्यान काही सचिवांनी "आम्ही अकोल्यातील वाघ आहोत" अशा शब्दांत धमकीवजा विधान करत वातावरण अधिकच तापवले. काही काळ परिस्थिती इतकी तणावपूर्ण झाली की वाद हातघाईपर्यंत जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. या सर्व प्रकाराचे साक्षीदार म्हणून उपस्थित पत्रकार व इतर सहभागी होते. मात्र, काहींनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचीही चर्चा आहे. दरम्यान, अकोले तालुक्यातील काही सचिवांविरोधात यापूर्वीही गैरव्यवहार व भ्रष्टाचाराच्या तक्रारी समोर आल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी सुमारे ३९ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती. त्यानंतरही काही सचिवांच्या वर्तनात सुधारणा झालेली नसल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

सहकार क्षेत्रातील जाणकारांच्या मते, "एकाच ठिकाणी अनेक वर्षे कार्यरत असलेल्या सचिवांमुळे स्थानिक पातळीवर मक्तेदारी निर्माण होत आहे. त्यामुळे शिस्तभंग व दादागिरीचे प्रकार वाढत आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित बदल्या आणि कठोर कारवाई आवश्यक आहे." या पार्श्वभूमीवर संबंधित सचिवांचे तात्काळ निलंबन करावे, अन्यथा त्यांची कर्जत-जामखेड किंवा इतर भागात बदली करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी पुढे येत आहे. दरम्यान, "प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्यास सहकार व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होईल," असा इशाराही व्यक्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रामाणिकपणे काम करणाऱ्या बहुसंख्य सचिवांची प्रतिमा मोजक्या व्यक्तींच्या वर्तनामुळे मलिन होत असल्याची खंतही व्यक्त होत आहे.

आता या प्रकरणाची प्रशासन कितपत गंभीर दखल घेते, संबंधित सचिवांवर नेमकी कोणती कारवाई होते आणि सहकार क्षेत्रात शिस्त प्रस्थापित करण्यासाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




*धुमाळ पाटील सोशल फाउंडेशनकडून महाराष्ट्र केसरी*

## हर्षवर्धन सदगीर यांचा भव्य सत्कार!

अकोले : (स. गांवकरी)

धुमाळवाडी येथील अंबिका माता यात्रा उत्सवाच्या निमित्ताने धुमाळ पाटील सोशल फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र केसरी पैलवान हर्षवर्धन सदगीर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम नामयज्ञ सप्ताह सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आला होता. यावेळी दुसरे पुष्प म्हणून ह.भ.प. कविराज महाराज झावरे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तन कार्यक्रमानंतर फाउंडेशनचे अध्यक्ष मा. प्रशांत धुमाळ व धुमाळवाडी गावच्या पोलीस पाटील सौ. प्रणालीताई धुमाळ यांच्या शुभहस्ते हर्षवर्धन सदगीर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना सदगीर यांनी अकोले तालुक्याचा भूमिपुत्र म्हणून आपल्या सत्काराचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. त्यांनी तरुणांना मार्गदर्शन करताना व्यसनांपासून व मोबाईलच्या अति वापरापासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच पालक व विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ आणि व्यायामाकडे लक्ष द्यावे, कुस्ती सारख्या पारंपरिक खेळांकडे तरुणांनी आकर्षित होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कुस्त्यांची रंगतदार दंगल; नामवंत मल्लांनी आखाडा गाजवला

श्रीगोंदा (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांचा तीन दिवसीय यात्रा उत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडला. या यात्रेत राज्याच्या विविध भागांतून आलेल्या नामवंत मल्लांनी कुस्तीच्या आखाड्यात दमदार सामने खेळत प्रेक्षकांची मने जिंकली. दि. 10 ते 12 एप्रिलदरम्यान झालेल्या या यात्रेची सुरुवात पहिल्या दिवशी शेअरणी वाटप व देवाचे गाडे ओढण्याच्या धार्मिक कार्यक्रमांनी झाली. रात्री करमणुकीसाठी लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी (दि. 11) दिवसभर खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. सायंकाळी यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या निकाली कुस्त्यांना प्रारंभ झाला. या कुस्ती स्पर्धेत पारनेर, इंदापूर, नगर, शिरूर, कर्जत, दौंड, श्रीगोंदा आदी तालुक्यांतील पैलवानांनी सहभाग घेतला. कुस्ती स्पर्धेतील विजेत्या व सहभागी पैलवानांना यात्रा कमिटीच्या वतीने ५०० रुपयांपासून ते ५१ हजार रुपयांपर्यंत रोख बक्षिसे देण्यात आली. अंतिम मुख्य कुस्तीतील विजेत्यास सदस्य दादासाहेब गोरख कोकाटे यांच्या हस्ते सुमारे १० हजार रुपयांची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. यावेळी आमदार बबनराव पाचपुते, ज्येष्ठ नेते कैलास पाचपुते, दत्तुनाना पाचपुते, लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते यांच्या हस्ते नामांकित कुस्त्या लावण्यात आल्या. कार्यक्रमास उपसरपंच नितीन ढमे, माजी उपसरपंच सोमनाथ टिमुणे, राकेश पाचपुते, शहाजी भोसले, राजेंद्र पाचपुते, पप्पूशेठ दांगट, चांगदेव पाचपुते, चंद्रशेखर मोरे, दादासाहेब कोकाटे, जालिंदर पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते. कुस्ती स्पर्धेचे पंच म्हणून पै. वस्ताद अन्सार पठाण, पै. राहुल पाचपुते, पै. अजय रंधवे, पै. सुनील पाचपुते, पै. गणेश खंडागळे आणि पै. माऊली गावडे यांनी काम पाहिले. रात्री लोकनाट्य सुरसंग ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम रंगला. तिसऱ्या दिवशी बालगोपाळांनी यात्रेतील विविध पाळणे व खेळांचा आनंद घेतला तसेच मिठाई खरेदी करत उत्सवाची सांगता झाली. लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते व यात्रा कमेटीचे अध्यक्ष विशाल भोसले-दांगट यांनी केलेल्या नियोजनामुळे तसेच श्रीगोंदा पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे संपूर्ण यात्रा शांततेत व यशस्वीरीत्या पार पडली.

## किनगावच्या अवंतिका केवटची बॉक्सींग स्पर्धेत गरुड झेप




फुलंब्री: (स. गांवकरी)

किनगाव (ता. फुलंब्री) येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी कु. अवंतिका रामकृष्ण केवट हिने राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धेत चमकदार कामगिरी करत भारतीय बॉक्सींग संघात पदार्पन केल्याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने तिचा सत्कार करण्यात आला. . कु. अवंतिका येथील प्रशालेत इयता दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असून तिने यापूर्वी १७ वर्ष वयोगटातून तामीळनाडु, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश,. चंदीगढ़ यासह विवीध ठिकाणी यश संपादन करत गोल्ड मेडल मिळविले होते. ग्रामीण भागातील आणि सर्व सामान्य कुटुंबातील कु. अवंतिकाने योग्य मार्गदर्शन व स्वतः ची जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी यामुळे हे यश मिळविले असून अरुणाचल प्रदेश येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला होता. तर नागपुर येथे झालेल्या फायनल बॉक्सींग स्पर्धेत सहभाग घेऊन १७ वर्ष वयोगटात सिल्वर मेडल जिंकत भारतीय बॉक्सींग संघात तिने सहभाग नोंदविला आहे.

तिच्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडाचे सरचिटणीस व पदवीधर मतदार संघाचे आ. सतिश भाऊ चव्हाण, अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सहचिटणीस प्रभाकरराव पालोरकर, कृषी पंडीत बाळासाहेब चव्हाण, प्रशासकिय अधिकारी एफ. जी. माळी, उपप्रशासकिय अधिकारी सुधीर श्रीखंडे, प्रशालेचे मुख्याध्यापक एम.एच. जाधव, बॉक्सींग कोच अर्जुन सपकाळ, क्रिडा शिक्षक ए.एस . खांडेकर तसेच शालेय समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य, प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ, पालक यासह अनेकांनी तिचे अभिनंदन केले.

## सोहम बने "भारत उदय श्री तर सुरज खळेची भारत कुमार श्री स्पर्धेत निवड



ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरातील श्रीमंतयोगी जिम्नेशियम मधील सोहम बने यांची भारत उदय श्री स्पर्धेत व सुरज खळे याची भारत कुमर श्री पदी निवड झाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. दिवा शहरात राहणारा सोहम बने व सुरज खळै गेली एक वर्षापासून श्रीमंतयोगी जिममध्ये मेहनत घेत असून जिमचे प्रशिक्षक ओमकार सावंत आणि रवी शेजवळ यांचे सुरजला मोठं योगदान मिळाले आहे. मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील मालदोली बांद्रेवाडी हे सुरज शिवराम खळे यांच छोटंस गाव असून आपली मेहनत व जिद्दीच्या बळावर महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत सूरजची निवड झाली आहे. व्यायामाची आवड असलेल्या सुरजला श्रीमंतयोगी जिम्नेशियमचे संचालक राहुल कानसकर व संकेश भावे यांचे देखील वेळोवेळी योगदान मिळाले असल्याचे सुरज खळे यांनी स्पष्ट केले आहे. मागील वर्षीच्या ठाणे जिल्हा ४५ वी अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेत सूरज यांनी तिसरा क्रमांक पटकावला होता. सुरज खळे यांची महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत निवड झाल्याने दिवा शहरात सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा देण्यात येत आहे.

# व्यसनाधीनता देशासमोरील गंभीर समस्या : संगीता महाजन

## नशामुक्त भारत अभियानाचा लोककलेद्वारे रावेर येथे जागर




रावेर : (स. गांवकरी)

व्यसनाधिनता ही देशा समोरील गंभीर समस्या असुन , व्यसनामुळे आनेक कुटुंब उध्वस्त होताना आपण पहात आहोत. तथा कुटुंबातील महिलेने खंबीरपणे निर्धार केल्यास ती आपले कुटुंबातील वडील, भाऊ,मुलगा,पती,यांना व्यसनमुक्त करू शकते .प्रत्येक कुटूंब व्यसनमुक्त झाले तरच नशा मुक्त भारत होईल असे प्रतिपादन रावेर लोकनियुक्त नगराध्यक्ष सौ संगीता महाजन यांनी केले . सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार व सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत समाज कल्याण कार्यालय जिल्हा परिषद जळगाव यांच्या वतीने आयोजित नशामुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक रावेर येथे करण्यात आली होते. या प्रसंगी लोककलावंत कार्यशाळेचा शुभारंभ व जनजागृती स्टॉल चे उद्घाटन रावेर च्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ महाजन यांच्या हस्ते करण्यात आले .

या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते पद्माकरभाऊ महाजन खान्देश लोककलावंत विकास परिषदेचे अध्यक्ष विनोद ढगे सौ ताराबाई सोपान पाटील,जेष्ठ वहीगायन लोककलावंत धनुआपा महाजन,यशवंत महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

नशामुक्त भारत अभियान अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नशा मुक्ती जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . जनजागृती स्टॉल, चित्रप्रदर्शन,लोककला पथनाट्य द्वारे जनजागृती करण्यात आली .

नशामुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती च्या कार्यात लोककलावंताची भुमिका महत्त्वाची असल्याने रावेर शहर व तालुक्यातील वहीगायन व विविध लोककला प्रकारात कार्यरत लोककलावंताचे एकदिवसीय कार्यशाळांचे आयोजित करण्यात आली होते .

या कार्यशाळेत जवळपास २५० लोककलावंतानी सहभागी होऊन , नशामुक्त भारत अभियानाचा संकल्प केला व आपल्या वही गायन लोककलतून नशामुक्त भारताचा जागर केला .

रावेर तालुक्यातील आहिरवाडी येथील बाल वहीगायन कलावंतानी वहीगायनातून व्यसनमुकती जनजागृती पर गीते सादर केली तर जळगाव येथील दिशा समाज प्रबोधन बहुउद्देशीय संस्थेचे पथनाट्य प्रमुख शाहीर विनोद ढगे व सहकाऱी यांनी पथनाट्य सादर करून उपस्थितांची नशामुक्ती संदर्भात प्रबोधन केले.

सदर कार्यशाळेचे आयोजन रावेर तालुका खान्देश वहीगायन लोककला परीषदेच्या विशेष सहकार्याने करण्यात आले होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित मान्यवरांचे स्वागत रावेर वहीगायन परिषदेचे तालुका प्रमुख गणेश महाजन यांनी केले तर आभार खान्देश लोककलावंत विकास परिषदेचे कोषाध्यक्ष सचिन महाजन व्यक्त केले. नशामुक्तीची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# धर्मवीर चषक क्रिकेट स्पर्धेला अकोल्यात उत्साहात प्रारंभ

अकोले : (स. गांवकरी)



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना राजकारणाबरोबरच समाजकारण करताना तरुणांना विविध क्षेत्रांत पुढे जाण्यासाठी प्रेरणा देत आहे. त्या अनुषंगाने ठाण्यासह राज्यातील विविध शहरांत क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जाते. अकोले शहरात सुरू झालेल्या धर्मवीर चषक स्पर्धेमुळे आनंद होत असून, सर्व तरुणांनी उन्हाची काळजी घेत क्रिकेटचा आनंद घ्यावा, असे आवाहन शिर्डी संस्थानचे विश्वस्त तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फॅमिली डॉक्टर डॉ. जालिंदर भोर यांनी केले. अकोले तालुका शिवसेना व अगस्ती क्रिकेट क्लब, अकोले यांच्या वतीने आयटीआय मैदानावर धर्मवीर चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन डॉ. जालिंदर भोर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना युवा नेते मारुती मेंगाळ, तालुका प्रमुख सुशांत गजे, शहरप्रमुख सचिन शेटे, कार्याध्यक्ष जगन शेठ देशमुख, बाळासाहेब भोर, मुकुंद भोर, जावेद जाहगीरदार, विशाल शेणकर, वाल्मिक मैड, विक्रम आरोटे, अमोल कपिले, सचिन भालेराव, निलेश शेणकर, महेश धुमाळ, गणेश पांडे, महेश झोळेकर, राम मोहिते, भगवान चौधरी आदी उपस्थित होते.अकोले तालुका शिवसेना व अगस्ती क्रिकेट क्लब यांनी तालुक्यातील तरुणांना क्रिकेटमधील कौशल्य दाखवण्याची संधी मिळावी या उद्देशाने आयपीएलच्या धर्तीवर आयटीआय मैदानावर ही स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचा शुभारंभ झाला असून ती सहा दिवस चालणार आहे. या स्पर्धेत आठ संघ सहभागी होत आहेत. हे संघ तालुक्यातील उद्योजकांनी प्रायोजित केले असून, ऑक्शन पद्धतीने खेळाडू निवडून संघरचना करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. ५५,५५५, द्वितीय पारितोषिक रु. ४४,४४४, तृतीय पारितोषिक रु. ३३,३३३ आणि चतुर्थ पारितोषिक रु. २२,२२२ ठेवण्यात आले आहे. तसेच विजेत्या संघांच्या मालकांना ट्रॉफी आणि सायकल देण्यात येणार आहे.

अतिशय चुरशीच्या या स्पर्धेमुळे तालुक्यातील तरुण खेळाडूंच्या कलागुणांना व्यासपीठ मिळत आहे. मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी प्रेक्षक उपस्थित राहत असून उत्कृष्ट समालोचन, दर्जेदार पंचगिरी, सुसज्ज मैदान, सर्व खेळाडूंना प्रायोजकांकडून ड्रेस कोडसह संपूर्ण किट, तसेच सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण यामुळे धर्मवीर चषकाचा लौकिक वाढला आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अगस्ती क्रिकेट क्लब, अकोलेचे सर्व सदस्य आणि अकोले तालुका शिवसेनेचे शिवसैनिक परिश्रम घेत आहेत.



ठाणे ; ठाण्यात एन के टी हॉल येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने १३५ वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, समाजरत्न नानजीभाई ठक्कर (ठाणावाला), एन के टी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पाटील, माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष हभप. चंद्रकांत महाराज डुंबरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे सचिव संतोष पडवळ, पत्रकार भीमराव शिरसाठ, पत्रकार नरेश म्हाडसे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना नानजीभाई म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे उच्च शिक्षण घ्या, नीतीने वागा, चांगले यश आणि वेळ तुमच्या आयुष्यात आल्याशिवाय राहणार नाही. **(फोटो - संतोष पडवळ ).**

## थोडक्यात बातम्या...

### २१ कोटींच्या निधीतून तीन पूल; चिपळूण-संगमेश्वरच्या विकासाला गती



चिपळूण (स. गांवकरी) : चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघातील महत्त्वाच्या दळणवळणाच्या प्रश्नांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला असून, केंद्रिय मार्ग निधी (CRF) अंतर्गत तीन पुलांच्या बांधकामासाठी एकूण २१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी आमदार शेखर निकम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळाल्याचे स्पष्ट होत आहे. संगमेश्वर तालुक्यातील कासार कोळवण येथील रा.मा. १६६ वांझोळे–कासार कोळवण–बोंड्ये ते रा.मा. १७४ या मार्गावरील बावनदीवरील मोठा पूल अतिवृष्टीत वाहून गेल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पुलाच्या बांधकामासाठी ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील दळणवळण सुरळीत होण्यास मोठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे संगमेश्वर तालुक्यातील कारभाटले येथील प्र.जि.मा. ४६ ते हेदली-अणदेरी-कारभाटले प्र.जि.मा. ४७ या मार्गावर कि.मी. ०/९०० येथे शास्त्री नदीवर ७२ मीटर लांबीच्या पुलाच्या बांधकामासाठी ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या पुलामुळे परिसरातील गावांमधील अंतर कमी होऊन नागरिकांची पायपीट मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही मागणी आता पूर्णत्वास जाणार आहे.

### उंचखडक बुद्रुक सारख्या झेडपी शाळा सर्वत्र व्हाव्यात - डॉ. मैथिलीताई तांबे

अकोले (स. गांवकरी) : गेल्या दोन वर्षापुर्वी बंद पडलेली उंचखडक बु येथील जिल्हा परिषदेची शाळा आज सामाजिक, आर्थिक, भौतिक व गुणवत्तेच्या दृष्टीने सर्वगुणसंपन्न झाली आहे. शुन्य ते ७० पटाचा प्रवास, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, प्रथम क्रमांक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी निवड, आयएसओ मानांकन, पहिल्याच प्रयत्नात नवोदय विद्यालयासाठी व सैनिक स्कुलसाठी दोन विद्यार्थ्यांची निवड, विज्ञान प्रदर्शन व स्कॉलरशिप तसेच सांस्कृतीक व क्रिडा स्पर्धेत प्रथम क्रमांक अशा विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनिय कामगिरी केली आहे. उंचखडक बुद्रुक सारख्या जिल्हा परिषदेच्या शाळा सर्वत्र व्हाव्यात असे प्रतिपादन संगमनेराच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे यांनी केले. तालुक्यातील उंचखडक बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेच्या विविध गुणदर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपिठावर क्लासवन अधिकारी प्रा. अरुण भांगरे, रिपाईचे राज्यसचिव विजय वाकचौरे, ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब मंडलिक, रोटरी क्लबचे सहा. प्रांतपाल अमोल वैद्य, शिक्षणतज्ञ भाऊसाहेब चासकर, कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे, अमृत उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ऍड. सागर शिंदे आदि उपस्थित होते. या कार्यक्रामाचे अध्यक्षस्थानी भाऊमामा खरात होते.यावेळी डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, शाळा चालविण्यासाठी चार स्तंभ असणे आवश्यक असते. त्यात मुख्याध्यापक, पालक, प्रशासन आणि सक्षम शाळा व्यवस्थापन समिती हे सर्व स्तंभ उंचखडक बुद्रुक शाळेला लाभले. म्हणून तर एक बंद पडलेली शाळा राज्याच्या आणि देशाच्या पटलावर जाऊ शकली आहे. उंचखडक बुद्रुक हे गाव छोटे असेल तरी शेतकरी दृष्ट्या सदन आहे. तरी देखील येथील पालकांनी शाळेवर विश्वास टाकला असून मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत पाठविले आहे. याच शाळेचे तीन माजी विद्यार्थी नुकतेच क्लासवन अधिकारी झाले असून त्यांचा येथे सत्कार करण्यात आला आहे. माझ्या माहितीनुसार इयत्ता पाचवीचा वर्ग याच वर्षी सुरू झाला आहे. त्यात २६ विद्यार्थी शिक्षण घेत असून अकोले तालुक्यातील अधिकाऱ्यांची मुले शहराच्या ठिकाणाहून ग्रामीण भागात शाळेत येतात ही फार मोठी कौतुकाची बाब आहे. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात सामान्य कुटुंबातील विद्यार्थी नवोदय आणि सैनिक स्कुलसाठी निवडली जातात यापेक्षा अधिक काय गुणवत्ता सिद्ध करावी. त्यामुळे, उंचखडक बुद्रुक शाळेसारख्या सगळीकडे शाळा झाल्या पाहिजे म्हणजे सामान्य कुटुंबातील मुलांना देखील गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळु शकेल असेही सौ. तांबे यांनी नमूद केले.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमानेभारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्त महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथसंपदा प्रदर्शन,त्यांचा जीवनपट व १८ तास वाचन अभियान असे उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार व जीवनात ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित वर्गासाठी जो संघर्ष केला,त्यातून आपल्या ला प्रेरणा मिळते.आजच्यावाचन अभियानातून आपण त्यांच्या ज्ञानप्रेमाचा आदर्श घेऊया असे म्हणाले.कार्यक्रमास,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अमृत बनसोडे,ग्रंथपाल डॉ.निलेश हांडे, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.राजेंद्र आंबवणे,प्रा.सुवर्णा डुंबरे,डॉ.रमेश काशीदे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश डुंबरे. दत्तात्रेय कदम, बारगळ,रासेयो स्वयंसेवक व ग्रंथालय विभागाने विशेष परिश्रम घेतले.

# कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर आपघातवार

ठाणे : (स. गांवकरी)



कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना सोमवारी घडली. एक सिमेंट मिक्सर आणि काळी-पिवळी इको टॅक्सी यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात 11 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, इको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून गाडीचा सांगाडा ओळखणेही कठीण झाले आहे. तर पोटगाव येथे दुचाकी आपघातात 2 जणांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पांजार पुलावर झाला मोठा अपघात झाला. सकाळी ११ वाजून १५ मिनिटांनी घडली घटना घडली. इको गाडीतून मुरबाड मधील काही रहिवाशी कल्याणला जात होते. - याच दरम्यान पांजार पुलावर मोठा अपघात झाला. अपघातात एक आज्जी आश्चर्यकारक रित्या बचावली आहे. प्रवाशांनी भरलेली इको कार महामार्गावरून जात असताना समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरने तिला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारमधील प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या कारमध्ये एकूण 12 प्रवासी होते, त्यापैकी 11 जणांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली. एक जण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्थानिकांची मदतीसाठी धाव, पोलिसांकडून पंचनामा सुरू अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम स्थानिकांनी अत्यंत जड अंतःकरणाने केले. टिटवाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतांचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर केला नसला तरी, मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. अपघाताचे कारण अद्याप अस्पष्ट हा अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाचा ताबा सुटला की वेगाचा अतिरेक नडला? हे अद्याप समजू शकलेले नाही. टिटवाळा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला होता.

# महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली विद्यालयाचे भाऊ साहेब खाडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की गेली शतकातील जगामध्ये सर्वात विद्वान व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व जातींना,धर्मांना, तळागाळातील लोकांना योग्य न्याय देण्यासाठी व देशात समता,बंधुता राखण्या साठी अशी सर्वसमावेशक राज्य घटना तयार केली.समाजातील दलित,शोषित,पीडित,कामगार मजूर,महिला अशा अनेक घटकांकरिता बाबासाहेबांचे काम उल्लेखनी राहिलेले आहे. विद्यालयाचे रंजीता पाटील यांनी ज्ञानपिपासू युगंधराच्या... संघटीत व्हा शिकूनी सारे.. प्रगतीस्तव संघर्ष करा रे या गीताच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सर्वांसमोर उभा केला. याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर संजय हिरे,भाऊसाहेब खाडे, अजित डांगे,संतोष कांबळे, मिलिंद खेत्री,संतोष सोनवणे, मंगेश तांबे,लक्ष्मण दुडे,दिनेश ताठे,विजय खरात,सोनाली माळवे,आशा गाडेकर,सोनाली कांबळे,वनिता भोर,आसावरी गायकर,शिल्पा भालेराव,रंजिता पाटील,रसिका शेळके,सरस्वती भताने,ईश्वर ढमाले उपस्थित होते.

# यू.एस. पोलो असोसिएशनचा पुण्यात स्टोअरसह विस्तार

पुणे : (स. गांवकरी)




यू.एस. पोलो असोसिएशन, भारतातील अग्रगण्य कॅज्युअलवेअर ब्रँड आणि युनायटेड स्टेट्स पोलो असोसिएशनचा (USPA) अधिकृत ब्रँड, महाराष्ट्रातील आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. शहरातील सर्वात प्रतिष्ठित आणि दीर्घकाळ चालणाऱ्या रिटेल ठिकाणांपैकी एक असलेल्या पुण्यातील जेएम रोडवर ८ एप्रिल २०२६ रोजी आपल्या नव्या फ्लॅगशिप स्टोअरचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी, अभिनेता आणि युवा आयकॉन सनी कौशल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून सायंकाळच्या कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्यांच्या उपस्थितीने भारतातील तरुण, स्टाईल-सजग ग्राहकांमध्ये ब्रँडचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी सूत्रसंचालकाच्या नेतृत्वाखालील अनेक मजेदार खेळ आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद साधून अतिथींशी संवाद साधला, ज्यामुळे स्टोअरमध्ये एक आकर्षक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले. त्यांनी रिबन कापून अधिकृत उद्घाटन केले आणि त्यानंतर चाहत्यांशी आपुलकीने संवाद साधला. ब्रँडशी असलेल्या आपल्या वैयक्तिक संबंधाबद्दल सांगताना सनी कौशल म्हणाले, “मला वाटतं की यू.एस. पोलो असोसिएशन सहज, स्टायलिश आणि अत्यंत सोपे असण्याचं प्रतीक आहे आणि मी सुद्धा तसाच आहे. मी एक अगदी साधा, टी-शर्ट, डेनिम, स्नीकर घालणारा माणूस आहे.” दोन मजल्यांवर पसरलेले हे ३,३०० चौरस फुटांचे भव्य स्टोअर, पुण्यात यू.एस. पोलो असोसिएशनच्या पहिल्या नव्या पिढीच्या रिटेल ओळखीची ओळख करून देते, जे अधिक समकालीन आणि आकर्षक खरेदीचा अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. या जागेत ब्रँडची अद्ययावत व्हिज्युअल लँग्वेज आणि डिझाइन घटक एकत्रित केले आहेत, जे त्याच्या नवीनतम जागतिक रिटेल वातावरणात दिसतात.

# मका हमीभाव खरेदी प्रक्रियेत गोंधळ

## कार्यालयासमोर शेतकऱ्यांचा संताप उसळला



किनवट : (स. गांवकरी)

रब्बी हंगामातील भरडधान्य खरेदीसाठी किनवट तालुक्यात आदिवासी विकास महामंडळामार्फत शासनाची हमीभाव खरेदी प्रक्रिया राबविण्यात येते. या प्रक्रियेत ज्वारी, मका, धान आदी पिकांचा समावेश असतो. यंदा तालुक्यात सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्रावर मक्याची लागवड झाल्याने बाजारभाव घसरले असून शेतकरी मोठ्या प्रमाणात हमीभाव खरेदीवर अवलंबून आहेत. दरम्यान, विविध संघटना व राजकीय पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर तसेच आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नांमुळे भरडधान्य खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, किनवट येथील आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयात यासंदर्भात मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.

कार्यालयाकडून काही माध्यमांना १३ एप्रिलपासून ऑनलाइन नोंदणी सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली होती. मात्र, शेतक-यांनी थेट आरोप केला आहे कि, प्रक्रीयेत व्यापाऱ्यांशी संगनमत करून ११ एप्रिल २०२६ च्या रात्रीपासूनच ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया गुपचूप सुरू करण्यात आली. यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी १३ एप्रिल रोजी पहाटेपासूनच कार्यालयासमोर मोठी गर्दी केली. तरी हा चौकशीचा विषय असुन या संदर्भात संबधित यंत्रणेकडुन आवश्यक चौकशी होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी बोलतांना सांगितले कि, “११ एप्रिल रोजी किंवा सुरवातीच्या ५० शेतक-यांची झालेली नोंदनी संदर्भात थेट नोंदनी केलेल्या शेतक-यांच्या शेतावर जाऊन पंचनामा करावा. एका हंगामात एकाच शेतात विविध पिकांची नोंद कशी होते?” असा सवाल त्यांनी केला. तसेच शेतकऱ्यांनी आपले ७/१२ उतारे, बँक खात्याची माहिती व्यापाऱ्यांना देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. अन्यथा अशा गैरप्रकारांना खतपाणी मिळते, असेही त्यांनी नमूद केले. दिनांक १३ एप्रिल रोजी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयात पाहणी केली असता तिथे केवळ एकच दिव्यांग महिला कर्मचारी उपस्थित असून त्यांच्याकडूनच संपूर्ण कामकाज सुरू असल्याचे आढळले. १० हजार हेक्टरवरील पिकांच्या खरेदी प्रक्रियेसाठी एवढी अपुरी यंत्रणा असल्याने ही प्रक्रिया सुरळीत कशी पार पडणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, परिस्थिती चिघळत असताना किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी तात्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना शांत केले व परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी आदिवासी विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक बरकमकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. शेती करताना आधीच विविध अडचणींना सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता प्रशासनातील या गोंधळामुळे आणखी एक संकट उभे ठाकले असून या संपूर्ण प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महात्मा फुलेंचा समतेचा विचार समाजासाठी दिशादर्शक : आ. भीमराव केराम

किनवट : (स. गांवकरी)



क्रांतिसूर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त किनवट शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य कार्यक्रमात आमदार भीमराव केराम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना फुलेंच्या समतेच्या आणि शिक्षणाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना आमदार केराम म्हणाले, “शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा भक्कम पाया रचणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य अतुलनीय आहे. दीन-दलित, शोषित आणि महिलांच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.”

कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार केराम यांच्या हस्ते महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. रामप्रसाद तौर, भाजप मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, ज्येष्ठ पत्रकार अ‍ॅड. मिलिंद सर्पे, सामाजिक कार्यकर्ते यशवंत कऱ्हाळे पाटील, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, सेवा निवृत्त पोलिस निरीक्षक यशवंतराव जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी विचारांना उजाळा देत समाजात समानता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले. आपल्या भाषणात आमदार केराम यांनी महात्मा फुलेंच्या ‘सत्यशोधक’ विचारधारेवर तसेच सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री-शिक्षणातील ऐतिहासिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. प्रतिकूल परिस्थितीतही फुले दाम्पत्याने समाजपरिवर्तनाचा जो दीप प्रज्वलित केला, तोच वारसा पुढील पिढीने जोपासणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास नगरसेवक संतोष मरसकोल्हे, नगरसेविका सौ. ललिता मारोती मुनेश्वर, रोहन येंड्रलवार, सामाजिक कार्यकर्त्या गंगुबाई परेकर, संजय गुरनुले, चळवळीचे कार्यकर्ते विवेक ओंकार, अ‍ॅड. सरपे, प्रमोद केंद्रे, बालाजी धोत्रे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी अभिवादन, मिरवणुका व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली विद्यालयाचे भाऊ साहेब खाडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की गेली शतकातील जगामध्ये सर्वात विद्वान व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व जातींना,धर्मांना, तळागाळातील लोकांना योग्य न्याय देण्यासाठी व देशात समता,बंधुता राखण्या साठी अशी सर्वसमावेशक राज्य घटना तयार केली.समाजातील दलित,शोषित,पीडित,कामगार मजूर,महिला अशा अनेक घटकांकरिता बाबासाहेबांचे काम उल्लेखनी राहिलेले आहे. विद्यालयाचे रंजीता पाटील यांनी ज्ञानपिपासू युगंधराच्या... संघटीत व्हा शिकूनी सारे.. प्रगतीस्तव संघर्ष करा रे या गीताच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सर्वांसमोर उभा केला. याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर संजय हिरे,भाऊसाहेब खाडे, अजित डांगे,संतोष कांबळे, मिलिंद खेत्री,संतोष सोनवणे, मंगेश तांबे,लक्ष्मण दुडे,दिनेश ताठे,विजय खरात,सोनाली माळवे,आशा गाडेकर,सोनाली कांबळे,वनिता भोर,आसावरी गायकर,शिल्पा भालेराव,रंजिता पाटील,रसिका शेळके,सरस्वती भताने,ईश्वर ढमाले उपस्थित होते.



### जयंती व महात्मा फुले जयंती निमित्त रक्तदान शिबिराला प्रतिसाद

राहुरी (स. गांवकरी) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सामाजिक समरसता व सामाजिक सद्भाव कार्य यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन 14 एप्रिल रोजी राहुरीत करण्यात आले होते .राहुरी शहरातील शनि मंदिरात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर , महात्मा ज्योतिबा फुले व भारत मातेच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी शिबिरात रक्तदान केले . विशेषतः तरूण वर्गाचा यात समावेश राहिला .यावेळी नगर येथील जनकल्याण रक्त केंद्राचे डॉक्टर शुभदा देशपांडे , जनसंपर्क अधिकारी शरद बळे , प्रियंका आढागळे, मनीषा जोशी, सुलभा , बाळासाहेब खरपुडे यांनी या रक्तदान प्रक्रियेत सहभाग घेतला . जनकल्याण रक्त केंद्राचे जनसंपर्क अधिकारी शरद बळे यांनी सांगितले की , हे रक्त केंद्र ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालते . थॅलेसिमिया रुग्णांना रक्त केंद्राच्या वतीने 150 रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करते . अधिकाधिक रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घ्यावा , असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी दिनकर ओहोळ यांचे निधन



श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी दिनकर ओहोळ (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.उच्च विचारसरणी, स्वच्छ व साधे राहणीमान ही त्यांची ओळख होती. सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. काष्टी येथील 'कॉलिटी ड्रायक्लीनर'चे राजेंद्र ओहोळ तसेच बारामती येथील 'वं योद्धा स्पोर्ट क्लब'चे साहेबराव ओहोळ यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे.



### महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

ठाणे (स. गांवकरी) : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आज, जिल्हा परिषद, ठाणे येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी उज्वला सपकाळे तसेच समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक समता, न्याय व बंधुता या मूल्यांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### कोंबून प्रवासी भरल्याने भीषण अपघात; तीन निष्पाप बालकांचा मृत्यू

ठाणे (स. गांवकरी) : कल्याण नगर हायवेवर सोमवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात तीन निष्पाप बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. प्रवासी वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी कोंबून नेण्यात आल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप करण्यात येत आहे. या दुर्घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिस मित्र मानद अधिकारी आंतरराष्ट्रीय संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष राजेश भांगे यांनी तीव्र प्रतिक्रिया देत संबंधित RTO अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली आहे. त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिप-रिक्षामध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी भरून वाहतूक केली जात होती. वाहनाचा ताबा सुटल्याने हा अपघात घडला आणि त्यात तीन लहान मुलांना आपला जीव गमवावा लागला, तर काही प्रवासी जखमी झाले आहेत.

# प्रेक्षकांनी तमाशाकडे कला म्हणून पहावे- रघुवीर खेडकर

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

महाराष्ट्रात ग्रामीण भागातील गावागात ग्रामदेवतांच्या यात्रा उत्सव सुरु आहे. त्या निमित्त आम्ही तमाशा कलावंत आमची कला तुमच्या गावात येवून सादर करतो.तेव्हा समोर बसलेले मायबाप प्रेक्षक आमच्याकडे वाईट नजरेने पहातात. कलाकारांना खरे मारतात,चेष्टा करतात,कला बंद पाडतात परंतु आम्ही सुध्दा सुसंस्कृत आहोत कलेच्या माध्यमातून त्यातून पोटासाठी दोन पैसे मिळविणे हा आमचा छंद आहे. त्यामुळे तमाशा पहाताना प्रेक्षकांनी कला म्हणून पहावे आणि आम्हाला प्रोत्साहन द्यावे अशी खंत जेष्ठ कलावंत राष्ट्रपती पुरस्कार विजेते रघुवीर खेडकर यांनी बोलताना व्यक्त केली.

दि.13 रोजी श्रीगोंदा येथे राष्ट्रपती पुरस्कार विजेते रघुवीर खेडकर लोकनाट्य तमाशा मंडळ आले असता. तमाशा फडाचे मालक रघुवीर खेडकर यांना नुकताच दिल्ली येथे



श्रीगोंद्यात पत्रकार संघाकडून खेडकर यांचा सन्मान

राष्ट्रपती यांच्या कडून पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला. हि बाब जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमानाची आहे.म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, जिल्हा सचिव पिटर रणसिंग, प्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेशमामा सुपेकर, जेष्ठ पत्रकार सुनिल कारंजकर,अक्षय तुपे,कुरुमकर सर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रघुवीर खेडकर यांचा फेटा, शाल,श्रीफळ, व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी माध्यमांनी बोलताना रघुवीर खेडकर म्हणाले कोरोना काळापासुन तमाशाला वाईट दिवस आले आहेत. महाराष्ट्रात सव्वाशे तमाशांचे फड आहेत,त्यापैकी फक्त दहाच तमाशे चांगले चालु आहेत. बाकीच्यांची खूप वाईट परिस्थिती आहे. खर्च सुध्दा निघत नाही. आमच्या फडात एकूण सहा गाड्या आणि कलाकार व लेबर असे शंभर लोक आहेत. त्यांचा दिवसाचा खर्च एक लाख होतो. वर्षभर तमाशा चालत नाही. कर्ज काढून कलाकारांना बिनव्याजी पैसे देवून कलाकार सांभाळावे लागतात. यात्रा काळात फक्त चाळीस कार्यक्रम होतात. आणि त्यातून आलेल्या पैशातून झालेले कर्ज फेडावे लागते अशी आमची अवस्था आहे.

खेडकर पुढे म्हणाले आमच्या मनामध्ये खूप दुःख असते,परंतु स्टेजवर गेल्यानंतर सर्व दुःख आम्ही विसरतो. आमच्या सुखाचे खरे क्षण फक्त स्टेजवर असतात. आमच्यातील काही कलाकारांचे उतार वयात खूप हाल होतात. वय झालेलं असतं उत्पंन्नाचे काही साधन नसते. मायबाप सरकार काही देत नाही. परंतु तो जुना काळ होता लोक अशिक्षित होते,आता सुसंस्कृत पिढी तयार झाली. परिस्थिती बदलत चालली आहे. आणी ज्यांचे उतार वयात हात चालु आहेत ते त्यांच्या खोडीमुळे चालु आहेत.

कुटुंबात मुल व्यसनाच्या आहारी चालली आहेत. आईवडील मोबाईल मध्ये व्यस्त आहेत.त्यामुळे मुलांवर संस्कार कमी होताना प्रकर्षाने जानवते. यासाठी भरकटलेल्या समाजाला दिशा देण्यासाठी महाराष्ट्रात फिरताना कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन करुण जनजागृती करतोयं, याचा मला अभिमान वाटतो कि मी काहीतरी चांगले काम करतोयं. मी वयाच्या नवव्या वर्षी तमाशात आई सोबत काम करायला सुरुवात केली. आता माझे वय झाले. आपली परंपरा पुढे चालवावी अशी मला मुलाकडून अपेक्षा नाही. कारण आतां सोशल मीडियाच्या जगात तमाशा वर वाईट वेळ आली आहे. तमाशा पहाताना तरुण पिढीला स्टेजवर फक्त चांगल्या सुंदर मुली पाहीजेत. विनोद नको आहेत. फक्त गाणे पाहिजे. गणगवळण आणि वगनाट्यांला पुढे प्रेक्षक नसतात याचे वाईट वाटते. मंदीच्या काळात तिकिटावर सुध्दा प्रेक्षक तमाशा पहायला येत नाही. याचे दुःख आहे. बिदाई कमी मिळते. कमी बजेटमुळे काही गावातील लोक तमाशा ऐवजी आर्केस्ट्रा ठेवतात. तरी मुलगा म्हणतो मी तमाशा चालवतो. त्यांच्या पुढे दुसरा पर्याय नाही.

मला दोन उच्चशिक्षित मुली आहेत. त्यामध्ये एक सीए आहे.तर दुसरी इंजिनिअर आहे. त्यांचे लग्न करुण दिले. आणि दोन मुल पैकी एक अपंग आहे आणि दुसरा माझ्या बरोबर काम पहातो.

## अजित बाबर यांची पुणे सिटी पोलिसपदी निवड



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव (बाबरवाडी) येथील अजित बापू बाबर यांची पुणे सिटी पोलिसपदी निवड झाली आहे. बाबरवाडी येथून पोलिस खात्यात निवड होणारे ते पहिलेच युवक ठरले आहेत. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अजित बाबर यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. "जीवनात काहीतरी करून दाखवायचे" या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी श्रीगोंदा येथील कौटिल्य अकॅडमीमध्ये तयारी केली. त्यांच्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. निवडीच्या आनंदानिमित्त बाबरवाडी ते लिंपणगाव दरम्यान त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. अजित बाबर यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## आश्रमशाळा अधीक्षकांवर २४ तास ड्युटीचा अन्याय

### कामाचे तास निश्चित करण्याची मागणी

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षक व अधीक्षिका यांच्यावर होत असलेल्याअन्याय विरोधात शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य च्या वतीने राज्याध्यक्ष राजू सरदार,यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी सर्व,अपर आयुक्त,ठाणे/ नागपूर/नाशिक अमरावती यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी ठाणे विभागात राज्य उपाध्यक्ष धीरजकुमार पाटील,ठाणे विभाग अध्यक्ष माधव मोतेवाड,सोशियल मिडिया प्रमुख योगेश चौधरी, जव्हार प्रकल्पात प्रदीप नवघरे यांनी विभागातील अधिक्षक व अधिक्षिका यांच्या मदतीने निवेदन देण्याचे काम सांभाळले. संघटनेच्या निवेदनानुसार, आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षक हा एकमेव संवर्ग आहे ज्याला २४ तास सतत काम करावे लागते,तसेच त्यांचे कामा चे कोणतेही निश्चित वेळापत्रक नाही.यामुळे संबंधित अधिकारी मानसिक ताण,आरोग्याच्या समस्या (शुगर,ब्लड प्रेशर,हृदय विकार) तसेच कौटुंबिक अडचणींना सामोरे जात आहेत.

शासनाच्या इतर विभागांमध्ये कर्मचाऱ्यांचे कामाचे तास निश्चित असून,आवश्यक सेवां मध्येही शिफ्ट पद्धती लागू आहे. तसेच,शासनाच्या नियमांनुसार आठवड्यातील कामाचे तास मर्यादित असताना अधीक्षकांना मात्र १२ ते २४ तास काम करावे लागत आहे.

अनेक ठिकाणी साप्ताहिक सुट्टी देखील दिली जात नाही, ही बाब गंभीर असून अन्याय कारक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.याशिवाय,५००ते७०० विद्यार्थ्यांवर एकाच अधीक्षक जबाबदारी असून,सहाय्यक अधीक्षक नियुक्तीबाबतचा शासन निर्णय अद्याप पूर्णपणे अंमलात आलेला नाही.तसेच आवश्यक कर्मचारी (बहुउद्देशीय कर्मचारी,सफाईगार,चौकीदार) यांची कमतरता असल्यामुळे कामाचा ताण अधिक वाढत आहे.



संघटनेने शासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेतः१) अधीक्षकांच्या कामाचे तास निश्चित करावेत २) अधीक्षक पदाला "अत्यावश्यक सेवा" घोषित करावे३) शिफ्ट पद्धती लागू करावी ४) साप्ताहिक व सार्वजनिक सुट्ट्या लागू कराव्यात ५)आवश्यक कर्मचारी भरती करावी६)शासन निर्णयांची कडक अंमलबजावणी करावी

संघटनेने इशारा दिला आहे की, या मागण्यांकडे तातडीने सकारात्मक दृष्टीकोनातून पाहून निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

## महिला उद्योजिकांना एमएसडीपी प्रमाणपत्रांचे वितरण

*मंचर येथे EDII चा उपक्रम; स्वावलंबनाकडे महिलांची वाटचाल*

मंचर, ता. आंबेगाव : (स. गांवकरी)

ग्रामीण व शहरी महिलांना स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या उद्देशाने भारतीय उद्योजकता विकास संस्थान (EDII), अहमदाबाद यांच्या पुढाकारातून आयोजित २० दिवसीय सूक्ष्म कौशल्य उद्यमिता विकास (एमएसडीपी) प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला उद्योजिकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

हा उपक्रम EDII व ॲक्सेंचर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे अंतर्गत जिज्ञासा लोकसंचलित साधन केंद्र, मंचर यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.

प्रशिक्षणादरम्यान महिलांना सुगंधित मेणबत्त्या (Aromatic Candles) तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. तसेच



पॅकेजिंग, ब्रँडिंग, मार्केटिंग व व्यवसाय व्यवस्थापन या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. समारोप कार्यक्रमास सौ. राजश्रीताई गांजाळे (नगराध्यक्ष, मंचर), डॉ. मेघा गाडे(माजी इनरव्हील अध्यक्ष) सौ. सविता गाडे (सचिव, जिज्ञासा CMRC मंचर), सौ. कांता पिंगळे (उपाध्यक्ष), श्री. सचिन मोरे (प्रकल्प समन्वयक, EDII), सौ. मनिषा जारकड (मॅनेजर) संदेश पवार लेखापाल श्री. विकास गोफणे, सौ. रजनी मिरके तसेच रिना वायकर, गौरी सैद व सुप्रभा पिंगळे भाग्यश्री चासकर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी महिलांना उद्योजकतेच्या माध्यमातून आत्मनिर्भर होण्यासाठी अशा प्रशिक्षणांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वउद्योग उभारण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

लांडेवाडी चिंचोली : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. लांडेवाडी चिंचोली येथील ग्रामपंचायत प्रांगणात संयुक्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी सरपंच संगीता शेवाळे पाटील, पोलीस पाटील रामदास शेवाळे, सरपंच अंकुश लांडे, व्यापारी दीपक लांडे, रमेश लवांडे, शिवाजी लवांडे, शालेय समितीचे अध्यक्ष संतोष लांडे, निवृत्त पोलीस अधिकारी मारुती विश्वासराव, हरिभक्त परायण पांडुरंग विश्वासराव यांच्यासह असंख्य महिला व अनुयायी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव



करत त्यांच्या विचारांची उजळणी केली. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या तत्वांचा संदेश गावागावात पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला. आपल्या भाषणात सरपंच संगीता शेवाळे पाटील यांनी सांगितले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान हे केवळ पुस्तक नसून, प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा मार्गदर्शक आहे. गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे हीच बाबासाहेबांना खरी अभिवादन ठरेल."

# संगमनेर रोटरी क्लबचे कार्य गौरवास्पद - गव्हर्नर रो. सुधीर लातुरे

संगमनेर : (स. गांवकरी)

समाजातील अनेक महनीय व्यक्तींपासून नेहमीच प्रेरणा मिळत असते. पूर्वीची परिस्थिती वेगळी व आत्ताची वेगळी आहे. आयुष्यात कुठेतरी शॉट कट घ्यावा लागतो. समाजाला भेडसावणाऱ्या सर्व अडचणी पायदळी तुडवत घेतलेला विचार, कृती, समाजाला अभिप्रेत जीवन जगण्यास उद्युक्त करत असते.पुरस्कारांसाठी सुयोग्य व्यक्ती शोधण्यासाठी अडचणी येतात .मात्र संगमनेर रोटरी क्लबच्या माध्यमातून सुयोग्य व्यक्तींची निवड या पुरस्कारासाठी केली ती सार्थ आहे. समाजासाठी पथदर्शक स्वरूपाची आहे.असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3232 चे प्रांतपाल रो. सुधीर लातूरे यांनी केले .'स्वार्थ विरहित सेवा' या संकल्पनेप्रमाणेच संगमनेर रोटरी




क्लबचे कार्य गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. येथील मालपाणी हेल्थ क्लब च्या सभागृहात आयोजित रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3132 च्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'रोटरी सक्षम ' व 'आत्मनिर्भर' या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून गव्हर्नर रो.सुधीर लातूरे बोलत होते. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 च्या फर्स्टलेडी सौ.संगीताताई लातुरे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रो.डॉ. राजगोपाल तापडिया, असिस्टंट गव्हर्नर रो.अमोल वैद्य , संगमनेर रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.विश्वनाथ मालाणी, सचिव रो.सौरभ म्हाळस हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असलेल्या डॉ.बाईसा गुंजाळ यांना 'रोटरी सक्षम पुरस्कार'

तर नांदूर खंदरमाळ येथील डॉ. प्रवीण घुले यांना 'रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलतांना गव्हर्नर रो. लातूरे म्हणाले की, प्रा.बाईसा गुंजाळ यांनी दिव्यांगत्वावर मात करून प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेत विद्यार्थ्यांना केलेले ज्ञानदान हे प्रेरणादायी असल्याचे म्हंटले .तसेच प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात सेवा देण्याचे डॉ. प्रवीण घुले यांचे कार्य तरुणांसाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पुरस्कार प्राप्त डॉ.बाईसा गुंजाळ व डॉ. प्रवीण घुले यांनी या पुरस्कार मुळे भविष्यात अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय पातळी काम करणाऱ्या सामाजिक संस्थेचा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी रोटरी क्लब च्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

रोटरीचे गव्हर्नर रो.सुधीर लातूरे यांनी मनमोकळा संवाद साधत आगामी ध्येयधोरणांवर चर्चा केली. संगमनेर रोटरी क्लबकडून आय केअर हॉस्पिटल हा दिशादर्शक प्रकल्प गेल्या अनेक वर्षांवरून रुग्णांची माफक दरात उच्चतम सेवा करत आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पुनर्वसन, दिव्यांग समावेशक उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकल्प तसेच डिजिटल शिक्षणाचा प्रसार अशा अनेक क्षेत्रांत सातत्याने संगमनेर रोटरी क्लबचे काम सुरू असल्याबद्दल त्यांनी गौरव केला.

प्रास्ताविक व स्वागत संगमनेर रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.विश्वनाथ मालाणी यांनी केले. क्लबच्या विविध सामाजिक व विधायक उपक्रमांचा आढावा क्लबचे सचिव रो.सौरभ म्हाळस यांनी घेतला. प्रमुख अतिथी रो.लातूरे यांचा परिचय रो.अजित काकडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. भारतभूषण नावंदर व रो.सुनील घुले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रो.डॉ किशोर पोखरकर, रो. विकास लावरे, रो.राजेंद्र खोसे, रो.घुले सर,रो.आनंद हासे,रो.डॉ.प्रमोद राजूस्कर, रो.अजित काकडे, रो.समीर शहा,रो.पवनकुमार वर्मा, रो.संकेत काजळे, रो.नरेंद्र चांडक, रो.महेश वाकचौरे,रो.योगेश गाडे यांनी सहकार्य केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती संयुक्तरित्या साजरी

नाशिक (स. गांवकरी) : प्रभाग क्रमांक 23 मधील बजरंगवाडी शाळा क्रमांक 65 मध्ये महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती संयुक्तरित्या जयंती समता संघटना च्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुखतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते सचिन ननावरे, पुष्पाताई शर्मा, कार्यक्रमाचे आयोजक समता संघटनाचे पंकज शिंदीकर ,संकेत पगारे , पत्रकार अमोल सोनवणे, किरण पाटील, अजिंक्य वझारे , प्रतिक हिरवे अखिलेश दाणी, कन्या भदाणे अथर्व दुनबळे, रुदाक्ष अहिरे नचिकेत शिंदीकर, कृष्णा सुर्यवंशी आधी सह परिषद जेष्ठ नागरिक व शाळेतील शिक्षक वृंद महिला, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांनी माहिती दिली. शौर्य विद्यार्थ्यांना वही पेन बिस्कीट आदी साहित्य वाटप करण्यात आले.



### बाबासाहेब यांचे विचार आजही प्रेरणादायी : आमदार बाबाजी काळे

राजगुरुनगर (स. गांवकरी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे ऐतिहासिक कार्य केले असून त्यांचे विचार आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी अभिवादन प्रसंगी केले. राजगुरुनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध मान्यवरांकडून त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते, प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर, भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे, शिवसेनेचे महिला जिल्हा संघटक विजयाताई शिंदे,प्राचार्या संध्या कांबळे, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, माजी सरपंच शांताराम घुमटकर, नगरसेवक मित्रसेन डोंगरे, वैभव घुमटकर आदी उपस्थित होते.आमदार बाबाजी काळे पुढे म्हणाले संविधान मुळे चालणारा आपल्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे समाजातील सर्व घटनांना समान जगण्याचा अधिकार मिळाला आहे.अशा विश्व रत्न ,महान नेत्याचा पूर्णाकृती पुतळा येथे उभा रहावा,यासाठी सर्वतोपरी मदत करू असे आश्वासन यावेळी आमदार यांनी दिले.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समितीचे अध्यक्ष अशोक कडलक, विद्याधर साळवे, विजय घेगडमल, संतोष डोळस, पी. के. पवार, कैलास केदारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक पी.के.पवार यांनी मांडले तर आभार अध्यक्ष अशोकजी कडलक यांनी मानले.

### सामाजिक संदेश देणाऱ्या 'पत्रावळ' लघुचित्रपटाला मानाचा सन्मान



पारनेर (स. गांवकरी) : मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ पारनेर तालुक्यातील मॉडेल व्हिलेज गोरेगाव येथील सुपुत्र, लेखक-दिग्दर्शक रामदास महादेव तांबे यांनी साकारलेला 'पत्रावळ' हा लघुचित्रपट सध्या चर्चेचा विषय ठरत असून, चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत सांस्कृतिक कलादर्पण लघुचित्रपट महोत्सव २०२६ मध्ये या चित्रपटाला 'लक्षवेधी लघुचित्रपट' हा मानाचा पुरस्कार सिने सुप्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे, जेष्ठ अभिनेते जयंत ओक आणि अभिनेते सुचित जाधव यांच्या हस्ते पारितोषिक मिळाले आहे. त्यांच्या या यशामुळे पारनेर तालुक्याच्या कला व सांस्कृतिक क्षेत्राच्या यशात मोठी भर पडली आहे. 'पत्रावळ' हा लघुचित्रपट केवळ एक कलाकृती नसून ग्रामीण वास्तव, सामाजिक जाणीवा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा संगम घडवण्यासाठी केलेला प्रभावी प्रयत्न आहे. एका साध्या, अशिक्षित पण निसर्गप्रेमी व्यक्तीच्या आयुष्याभोवती फिरणारी ही कथा समाजाला अंतर्मुख करणारी आहे. गावोगावी फिरत विविध समारंभात वापरल्या जाणाऱ्या पानांपासून तयार होणाऱ्या पत्रावळींचा व्यवसाय करताना तो व्यक्ती केवळ उदरनिर्वाह करत नाही, तर नकळत पर्यावरण रक्षणाचे मोठे कार्य करत असतो, हा या चित्रपटाचा गाभा आहे. प्रमुख भूमिका डॉ. सुरेश शिंदे,सहाय्यक भूमिका डॉ. वर्षा बांडे, राहुल बरडे, ध्वनी किरण गावडे संकलन अमेय गावडे, छायाचित्रण सोमेश थोरात, ग्राफिक्स वैष्णवी तांबे, लेखन दिग्दर्शन रामदास तांबे निर्माता किरण गावडे, रामदास तांबे, सौजन्य माळकूप आणि भाळवणी ग्रामस्थ यांचे आहे.

### डॉ. बाबासाहेब यांना विनम्र अभिवादन



रावेर (स. गांवकरी) : भारतरत्न माहा मानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देवाभाऊ फाऊंडेशन तर्फे विनम्र अभिवादन करण्यात आले. कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन जळगाव जिल्हा तर्फे माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक व दलित, आदिवासींचे कैवारी बहुजन वंचितांच्या न्याय हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समता, बंधुता व न्याय यांचे प्रणेते होते. त्यांनी शिक्षण, सामाजिक सुधारणा व संविधानाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांना समाजात समता, बंधुता व न्याय यांचा संदेश देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिव्हिल हॉस्पिटल समोरील पुतळ्यास श्री. अनिल वाघ साहेब पोलिस निरीक्षक जिल्हा पेठ पोलिस स्टेशन जळगाव यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन देवाभाऊ फाऊंडेशन जळगाव लोकसभा सहसमन्वयक प्रल्हाद सोनवणे प्रमोद वाणी कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन जिल्हाध्यक्ष विनोद पवार यांनी केले पिंपल्स रिपब्लिकन पार्टी जळगाव जिल्हाध्यक्ष आयु. राजुभाई मोरे देवाभाऊ फाऊंडेशन जळगाव लोकसभा सहसमन्वयक प्रल्हाद सोनवणे बाबुराव वाघ प्रसिद्ध हाड वैध डॉ अवधूत दादा चौधरी जेष्ठ मार्गदर्शक श्री माधवराव कुळकर्णी बाबुजी नगरसेवक सुरेश भाऊ सोनवणे राष्ट्रीय हिंदू संघटन जिल्हाध्यक्ष श्री सुरेश भाऊ वाघ उपाध्यक्ष कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष प्रमोद वाणी जिल्हाध्यक्ष विनोद पवार संपर्क प्रमुख सुरसिंग पाटील जळगाव हॉकर्स युनियन जिल्हाध्यक्ष सुनील जाधव माजी उपमहापौर मिलिंद सपकाळे रेडक्रॉस सोसायटीचे डॉ शंकरलाल सोनवणे मनपा माजी आरोग्य अधिकारी विकास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पारनेर तालुक्यात बाबासाहेब यांची १३५वी जयंती साजरी

पारनेर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती (१४ एप्रिल २०२६) मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरातील नागरिकांनी या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. बाबासाहेबांच्या आदर्शांवर आधारित समता, न्याय, शिक्षण आणि सामाजिक बंधुत्वाच्या मूल्यांचा जागर करण्यात आला.



नगर पारनेर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आमदार दाते यांनी बाबासाहेबांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी समस्त देशवासीयांना आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून देशाला समता आणि न्यायाचा मार्ग दाखवला असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथजी कोरडे यांनी देखील बाबासाहेबांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. त्यांनी बाबासाहेबांच्या शिकवणीप्रमाणे शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा अवलंब करून समाजातील विषमता दूर करण्याचे आवाहन केले. पारनेरचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनीही पुतळ्यास पुष्पवृष्टी करून महामानवाला अभिवादन केले आणि समस्त देशवासीयांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

आज दिवसभर पारनेर शहर आणि संपूर्ण तालुक्यात आंबेडकर जयंतीचा उत्सव पाहायला मिळाला. शहरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. रात्री आकर्षक रोशणाई करण्यात आल्याने पूर्ण शहर दिव्यांनी उजळून निघाले होते. बाबासाहेबांच्या प्रतिमा आणि पुतळ्याभोवती फुलांची सजावट, ध्वज आणि बॅनर्सने वातावरण भक्तिमय झाले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती होती: भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी नगरसेवक शंकर नगरे, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवकअमित जाधव, निखिल गायकवाड, राजेंद्र उबाळे, टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, ॲड .तुषार औटी, लहू भालेकर, सुभाष दुधाडे, श्रीमती सोबले, ॲड सोनवणे, किरण सोनवणे, सचिन नगरे, राजे सर, माजी सरपंच श्रीमती मोरे, सचिन उमाप, अनिल सातपुते, संजीवन सोनवणे, रोहन नगरे, निलेश गायकवाड, अक्षय जाधव, अजय जगताप, प्रकाश नगरे, ऋतिक गायकवाड, योगेश कांबळे, राकेश अल्हाट, करण धोत्रे आदी. यांच्यासह बौद्ध बांधव, ग्रामस्थ आणि पारनेर तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते तर संपूर्ण भारतातील सामाजिक न्यायाचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त पारनेरकरांनी एकत्र येऊन त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" ही बाबासाहेबांची शिकवण आजही प्रासंगिक आहे.

## सौ. वैदेही वासुदेव गायकवाड यांना (Ph.D.) पदवी प्रदान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया ज्युनिअर कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करणाऱ्या सौ.वैदेही वासुदेव गायकवाड (मोहिते)यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची "डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी" (Ph.D.) अर्थात "विद्यावाचस्पती" पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सौ.गायकवाड या पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्राच्या विद्यार्थिनी असून त्यांनी "महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांचा सांस्कृतिक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला होता. या अभ्यासामध्ये त्यांनी विविध भक्ती संप्रदायांचा सखोल अभ्यास करून त्यांतील सामाजिक, आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचा अभ्यास मांडला आहे. तसेच ही मूल्ये सामान्य माणसाच्या जीवनात कशी रुजवता येतील आणि त्यातून सर्वांगीण विकास कसा साधता येईल, यावर त्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रबंध मार्गदर्शक डॉ.वसंतराव शेंडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ माहेश्वरी गावीत यांचेही सहकार्य व मार्गदर्शन संशोधनात उपयुक्त ठरले. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी तसेच सुमित्रा भालेराव यांनी सौ.गायकवाड यांचे अभिनंदन करून सत्कार केला. सौ.वैदेही गायकवाड या ह.भ.प.चंद्रकांत महाराज मोहिते व सौ. पुष्पलता चंद्रकांत मोहिते यांच्या कन्या असून वैकुंठवासी श्री विनायकराव मार्तंडराव गायकवाड व वैकुंठवासी सौ. सुलोचना विनायक गायकवाड यांच्या त्या सून आहेत.

## वासुंदे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

*समता बंधुता व शिक्षणाचा विचार तरुण पिढीने आत्मसात करावा : माजी उपसरपंच शंकरराव बर्वे*

पारनेर : (स. गांवकरी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी दिलेला समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश आजच्या तरुण पिढीने आत्मसात करणे काळाची गरज आहे. वासुंदे ग्रामस्थांच्या एकजुटीने असा सामाजिक सलोखा जपणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल. असे मत माजी उपसरपंच शंकरराव बर्वे यांनी व्यक्त केले.



पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वासुंदे ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात महामानवास अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीमध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी उपसरपंच शंकर बर्वे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक दत्तात्रय साळुंके, इंजि. निकील दाते, स्वप्नील झावरे, बापूसाहेब गायखे, इंजि. प्रसाद झावरे, अमोल साठे, किरण पोपळघट, सचिन वाबळे, अमोल पोटघन, संग्राम झावरे, समीर कंदलकर, संजय झावरे, अरुण वाबळे, प्रवीण झावरे, विशाल झावरे, भाऊसाहेब हिंगडे, विकासआण्णा झावरे, गणेश शिरतार, सिकंदर शेख, इंजि सागर साळुंके, मनोज झावरे, निलेश गायखे, दत्ता शिरतार, सुमित औटी, गणेश बर्वे, गणेश साळुंके, गणेश झावरे, अक्षय दाते, निलेश भालके सर, शरद सैद, सुरेश शिंदे भास्कर दाते, भाऊ साळुंके, अशोक चेमटे सर, संतोष झावरे, संदीप खंडाळे, सोमनाथ झावरे, रुपेश साठे, रामनाथ जगदाळे, अविनाश साळुंके, विनायक झावरे, ग्रामविकास अधिकारी भास्करराव लोंढे, तलाठी शिंदे भाऊसाहेब, आदित्य शिर्के, उद्योजक दादा तळेकर, शांताराम शिंदे,संदीप उर्फ नामा दाते, किरण गायखे आदी वासुंदे येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

> महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हीच खऱ्या अर्थाने समाजाची शक्ती आहे. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्याला हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून दिली. वासुंदे येथील ही जयंती म्हणजे केवळ सोहळा नसून, त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प आहे. तरुणांनी शिक्षणाद्वारे स्वतःची आणि गावाची प्रगती साधायला हवी.
> **- अमोल साठे**
> **(आंबेडकरी अनुयायी)**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती उत्साहात साजरी

पारनेर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती (१४ एप्रिल २०२६) मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरातील नागरिकांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. बाबासाहेबांच्या विचारांचा — समता, न्याय, शिक्षण आणि सामाजिक बंधुत्व — जागर करण्यात आला.



यावेळी पारनेर येथे दीपक अण्णा लंके यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अर्जुन भालेकर यांनी देखील बाबासाहेबांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले आणि महामानवाला अभिवादन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे रवींद्र राजदेव यांनीही पुतळ्याचे पूजन करून हार घालून अभिवादन केले. यावेळी त्यांनी समस्त देशवासीयांना आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. बाबासाहेबांनी दिलेल्या भारतीय संविधानामुळे देशात समता आणि न्यायाची मूल्ये रुजली असल्याचे सर्वांनी सांगितले.

आज दिवसभर पारनेर शहरात आंबेडकर जयंतीचा उत्सव पाहायला मिळाला. शहरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. बाबासाहेबांच्या प्रतिमा आणि पुतळ्याभोवती फुलांची माळा, ध्वज आणि बॅनर्सने वातावरण भक्तिमय झाले होते.


यावेळी प्रमुख उपस्थिती होती: राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अर्जुन भालेकर, दीपक अण्णा लंके, रवींद्र राजदेव, नगरसेवक योगेश मते, नगरसेविका हेमांगी नगरे, नगरसेवक अमित जाधव, जितेश सरडे, अभय नांगरे, निखिल गायकवाड, किरण सोनवणे, जगदीश गागरे, सचिन उमाप, अनिल सातपुते, संजीवन सोनवणे, रोहन नगरे, निलेश गायकवाड, अक्षय जाधव, अजय जगताप, प्रकाश नगरे, ऋतिक गायकवाड, योगेश कांबळे, राकेश अल्हाट, करण धोत्रे आदी. यांच्यासह बौद्ध बांधव, ग्रामस्थ आणि पारनेर तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते तर संपूर्ण भारतातील सामाजिक न्याय, शिक्षण आणि समानतेचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त पारनेरकरांनी एकत्र येऊन "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या त्यांच्या त्रिसूत्रीचा अवलंब करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमातून सामाजिक सलोखा आणि बंधुत्वाची भावना अधिक दृढ झाली.

## 'हे' वीज मीटर लावून ग्राहक बनले 'स्मार्ट', १०० कोटींची बचत

अहिल्यानगर (स. गांवकरी)

दोन वर्षांपासून रडतखडत चालेल्या स्मार्ट मीटर जोडणी योजनेला गेल्या काही महिन्यात राज्यात वेग आला असून एक कोटींहून अधिक ग्राहकांना स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज पुरवठा करण्यात यश आले आहे. महत्वाचे म्हणजे, या मीटरमुळे अनेक वीज ग्राहकाना आपल्या बिलात स्मार्ट बचत करता आली आहे. विजेची मागणी कमी असताना स्मार्ट मीटरचा वापर केल्यास प्रति युनिट ८० ते ९० पैशांची बचत होते. महावितरणच्या या योजनेमुळे गेल्या वर्षी ग्राहकाने १०० कोटीची बचत करता आली. महावितरणकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे मागील दोन महिन्यात तब्बल २० लाखांहून अधिक ग्राहकांनी स्मार्ट मीटर जोडणी घेतली. जोडणीचा वेग कायम राहिल्यास पुढील वर्षी मार्चपर्यंत घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी



लिमिटेडला (महावितरण) यश येईल, असा दावा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले. स्मार्ट मीटरचा विरोध कमी करण्याकरिता महावितरणने जुनी मीटर बदलून स्मार्ट लावण्याकरिता आकारण्यात आलेले शुल्क माफ केले. आता केवळ नवीन मीटरकरिता शुल्क आकारले जात आहे. तसेच, प्री-पेड ऐवजी पोस्ट-पेडचा पर्याय देऊ केला. शिवाय ग्राहकांना वीज बिल बचतीचे म्हणजे 'टाइम ऑफ डे'चे (टीओडी) फायदे दिले जात आहेत. यामुळे विजेची मागणी कमी असताना वापर केल्यास दर कमी असल्याने वीज बिल दरात कपात होते.

# वडगाव सावताळ येथे तमाशा कलावंतांवर जीवघेणा हल्ला

### गुन्हे दाखल; लोककलावंतांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर | सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी घेतली गंभीर दखल, आरोपींना बेड्या ठोकण्याचे आदेश

पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील वडगाव सावताळ येथे बनाईदेवी यात्रोत्सवाच्या आनंदाला गालबोट लावणारी एक अत्यंत निंदनीय घटना घडली आहे. यात्रोत्सवानिमित्त आयोजित तमाशा कार्यक्रमादरम्यान काही मद्यधुंद तरुणांनी तमाशा कलावंतांवर जीवघेणा हल्ला चढवला. या हल्ल्यात केवळ पुरुष कलाकारच नव्हे, तर महिला कलाकारांनाही मारहाण करण्यात आली असून त्यांच्या अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न झाला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी गुन्हेगारांवर



कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १२ एप्रिल रोजी यात्रेनिमित्त दिपाली आनंदा भोसले यांच्या तमाशा मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रात्री दहाच्या सुमारास कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच रविंद्र शिंदे, अमोल शिंदे आणि बाळू बर्डे या प्रमुख संशयितांसह इतर ४ ते ५ जण मद्यधुंद अवस्थेत स्टेजजवळ आले. त्यांनी कार्यक्रम कधी सुरू होणार यावरून सुरुवातीला वाद घातला आणि त्यानंतर अचानक सात-आठ जणांच्या टोळक्याने कलावंतांना शिवीगाळ करत धक्काबुक्की सुरू केली. हा वाद एवढ्या थराला गेला की हल्लेखोरांनी कलावंतांना लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या गणेश अष्टीकर भोसले यांच्यावर लोखंडी खुट्याने वार करून त्यांना जखमी करण्यात आले. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, या टोळक्याने महिला कलाकार गीतांजली भोसले आणि राजश्री तांबे यांचे कपडे फाडून त्यांची विटंबना केली. केवळ शारीरिक इजा करूनच हे हल्लेखोर थांबले नाहीत, तर त्यांनी तमाशातील ऑर्गन, ढोलकी, माईक, मिक्सर आणि साऊंड सिस्टिम यांसारख्या वाद्यांची आणि साहित्याची तोडफोड केली. या तोडफोडीत कलावंतांचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि पोलिसांनी धाव घेतली, मात्र तोपर्यंत हल्लेखोर पसार झाले होते. या भयंकर प्रकारामुळे कलावंतांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले असून अखेर तो कार्यक्रम रद्द करण्यात आला. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्वतः पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्याशी संपर्क साधून आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या घटनेमुळे लोककलावंतांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, ग्रामीण भागात अशा समाजकंटकांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

### गेल्या आठवड्यात संगमनेर तालुक्यातही मारहाण

१ एप्रिल रोजी संगमनेर तालुक्यातील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वरूडी फाटा येथे तमाशा कलावंतांच्या वाहनाला एका वाहनचालकाने कट मारत कलावंतांना बेदम मारहाण केल्याने आठजण जखमी झाले होते. कलावंतांचा विनयभंग केला होता. याप्रकरणी घारगाव पोलिसांत चौघांसह अनोळखी दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणीही संताप व्यक्त करण्यात आला होता. ही घटना ताजी असतानाच पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे सुद्धा कलावंतांना मारहाण झाल्यामुळे कलाक्षेत्रातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये हवामान उष्ण व दमट राहील. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कोरडे हवामान वर्तविण्यात आले असून गेल्या दोन-तीन दिवसांपासून तापमानात काही प्रमाणात वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानवी व प्राण्यांच्या आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे. उष्माघाताची लक्षणे दिसताच नागरिकांनी तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क करावा. नागरिकांनी तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाणी कमी होऊ नये म्हणून ओ.आर.एस., लस्सी, ताक, कैरीचे पन्हे व लिंबू पाण्याचा नियमित वापर करावा. दुपारी बारा ते तीन वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री वा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्याने डोके, मान व चेहरा झाकावा. गडद, घट्ट व जाड कपड्यांऐवजी हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी नेहमी सोबत ठेवावे.

## नगर तालुक्यातील आगडगाव येथील यात्रेत गेलेल्या महिलेला मारहाण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर तालुक्यातील आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिरातील यात्रेनिमित्त दर्शनासाठी गेलेल्या महिलेला तिघांनी मारहाण केल्याची घटना शनिवार (११ एप्रिल) रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडली. हिराबाई तुळसीदास बोरूडे (वय- ३९, मुळ रा. आगडगाव, ता. अहिल्यानगर, हल्ली रा. कानडे मळा, सारसनगर, अहिल्यानगर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. न्यायालयात चालू असलेली केस मागे घेण्यासाठी ही मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, यासंदर्भात हिराबाई बोरूडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश देवराम साळुंके, सागर देवराम साळुंके आणि अमोल कारभारी कराळे (सर्व रा. आगडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला शनिवारी रात्री साडेदहाच्या सुमारास आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिर परिसरात देवदर्शनासाठी गेल्या होत्या. यावेळी संशयित आरोपींनी फिर्यादीला गाठले. कोर्टात चालू असलेली केस मागे घ्या, असे म्हणत शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर मारहाणीत झाले आणि सागर साळुंके याने त्याच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीला मारहाण केली. तसेच अन्य संशयित आरोपींनी फिर्यादीला मारहाण करून 'जर केस मागे घेतली नाही, तर तुम्हाला जिवे ठार मारून टाकू', अशी धमकी दिली. या प्रकारानंतर घाबरलेल्या महिलेने तत्काळ अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पोलिसांनी तिघांविरूध्द गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार भवार करीत आहेत.

## नगर- सोलापूर महामार्गावरील हॉटेल मध्ये गेलेल्या तरुणीवर अत्याचार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर - सोलापूर महामार्गावरील नगर तालुक्यातील अंबिलवाडी शिवारात असलेल्या हॉटेल तुळजा भवानी येथे एका २२ वर्षीय तरुणीवर हॉटेल मालकाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात हॉटेल मालक जनार्धन जाधव आणि एका अनोळखी कामगारावर अत्याचार आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ११ एप्रिल रोजी सायंकाळी एका व्यक्तीची चौकशी करण्यासाठी हॉटेलवर गेली होती. त्यावेळी तिथे असलेल्या कामगाराने तिला माहिती न देता हॉटेल मालक जनार्धन जाधव याला बोलावले. जाधव याने पीडितेशी अश्लील भाषेत बोलण्यास सुरुवात केली. महिलेने याला विरोध केला असता, आरोपी कामगाराने तिचा हात धरला आणि मालकाने तोंड दाबून तिला जबरदस्तीने हॉटेलच्या वरील मजल्यावर असलेल्या खोलीत ओढत नेले. खोलीत नेल्यानंतर कामगाराने पीडितेची ओढाताण केली आणि तो बाहेर निघून गेला. त्यानंतर जनार्धन जाधव याने पीडितेच्या असहायतेचा फायदा घेत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. जाताना आरोपीने खोलीला बाहेरून कडी लावून तिला डांबून ठेवले. पीडितेने हिंमत दाखवून खोलीच्या दरवाजाला लाथ मारून तो उघडला आणि खाली आली. मात्र, दोन्ही आरोपींनी तिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. 'जर कोणाला काही सांगितले तर तुला जिवंत मारून टाकू', अशी धमकीही त्यांनी दिली. या घटनेनंतर पीडितेने पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने करत आहेत.



## "कायद्याचे ज्ञान हेच सर्वात मोठे शस्त्र"- अ‍ॅड. सुरेश लगड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी येथील गुलमोहोर रोड पोलीस चौकी परिसरात वंचित बहुजन आघाडी प्रणित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड आणि RTO अधिकारी शंकर कराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना वंचित बहुजन आघाडीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी प्रस्थापित व्यवस्थेवर कडाडून प्रहार करत, "ज्या मनुस्मृतीने शूद्रांना शिक्षण नाकारले, त्याच व्यवस्थेला छेद देत महात्मा फुले यांनी क्रांतीची बीजे पेरली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेचे संविधान देशाला दिले. त्यामुळे समतेचा विचार हाच आमच्यासाठी खरा सण आहे,"असे स्पष्ट केले. यावेळी अ‍ॅड. सुरेश लगड यांनी आपल्या प्रभावी भाषणातून संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "संविधान हे केवळ कागदावरील नियम नसून, ते कोट्यवधी शोषितांच्या अस्तित्वाचे आणि न्यायाचे अभेद्य सुरक्षा कवच आहे. आजच्या काळात कायद्याचे ज्ञान हेच सर्वात मोठे शस्त्र असून, युवकांनी संविधानाच्या आधाराने स्वतःला सक्षम करणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी आपल्याला याचिका नव्हे तर अधिकार दिले आहेत, ही जाणीव प्रत्येकाने ठेवावी." तसेच त्यांनी दुसऱ्या कार्यक्रमातील भाषणातही युवकांना मार्गदर्शन करत सांगितले की, "कायद्याची जाण आणि संविधानिक मूल्ये आत्मसात केल्याशिवाय समाजातील अन्यायाविरुद्धची लढाई अपूर्ण राहते. शिक्षण आणि कायद्याच्या बळावरच परिवर्तन घडू शकते, त्यामुळे युवकांनी अभ्यासू, सजग आणि जबाबदार नागरिक बनण्यावर भर द्यावा." RTO अधिकारी शंकर कराळे यांनीही मार्गदर्शन करत, "बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे हीच खरी प्रगती आहे.

# बिजवडी प्राथमिक आरोग्य केंद्रात 'पुस्तकांचे पीएचसी' कार्यान्वित

इंदापूर : (स. गांवकरी)



"महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात वसलेले भिलार हे गाव 'पुस्तकांचे गाव' म्हणून जगभरात प्रसिद्ध आहे. महाबळेश्वर आणि पाचगणी यांसारख्या थंड हवेच्या ठिकाणांच्या अगदी जवळ असलेले "यशदा प्रशिक्षण केंद्र पुणे" येथे प्रशिक्षणासाठी असताना गावी भेट देऊन पुस्तकाच्या गावची संकल्पना अमलात आणण्यासाठी पी एस सी मध्ये प्रयत्न केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनाला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. त्यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावेत आणि दवाखान्यात येणारा रुग्ण वैचारिकदृष्ट्या समृद्ध होऊन बाहेर पडावा, याच भावनेतून आम्ही ही छोटीशी ग्रंथपेढी सुरू केली आहे.शारीरिक आजारांसोबतच वाचनामुळे रुग्णांचे मानसिक आरोग्य सुधारावे आणि त्यांचा ताण कमी व्हावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे."

— डॉ. गणराज चौगुले, प्रभारी वैद्यकीय अधिकारी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र, बिजवडी ता. इंदापूर जि. पुणे येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी आणि वैचारिक क्रांतीचा वारसा पुढे नेत, आरोग्य केंद्राचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. गणराज चौगुले यांच्या संकल्पनेतून 'पुस्तकांचे पीएचसी' (PHC) या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. केवळ जयंती साजरी न करता, बाबासाहेबांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संदेशाला कृतीत आणण्यासाठी डॉ. गणराज चौगुले यांनी आरोग्य केंद्रातच रुग्णांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी छोटेखानी ग्रंथालय अर्थात 'पुस्तकांचे पीएचसी' सुरू केले आहे. या कार्यक्रमाचा उद्देश आरोग्य सेवेसोबतच ज्ञानवृद्धीला चालना देणे हा होता. आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्ण व नागरिकांना वाचनाची सवय लागावी आणि आरोग्याबाबत जनजागृती व्हावी, यासाठी पुस्तकांचा उपक्रम सुरू करण्यात आला.यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, संविधान , श्री छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, संत तुकाराम महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, महान शास्त्रज्ञ डॉ. अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद आणि इतर थोर महापुरुषांच्या साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रगती करे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, "बाबासाहेबांनी केवळ राज्यघटनाच दिली नाही, तर समता, बंधुता आणि आरोग्याविषयीचे त्यांचे विचार आजही आम्हाला प्रेरणा देतात. दीन-दलितांच्या सेवेचा जो वारसा त्यांनी दिला, तोच वारसा समोर ठेवून आरोग्य विभागाने काम करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." यावेळी अनेक वक्त्यांचे मनोगत आरोग्य सहाय्यक श्री. देवेंद्र उत्तेकर, श्री. दत्तात्रय झगडे, आरोग्य सहायिका श्रीमती कमल पांचाळ, कनिष्ठ सहाय्यक श्री प्रवीण क्षीरसागर, औषधनिर्माण अधिकारी श्री. प्रदीप गोलांडे, आरोग्य सेविका श्रीमती. रोहिणी म्हेत्रे, श्रीमती. रिझवाना तांबोळी, श्रीमती. आशा पतंगे, श्रीमती. मनीषा दंडी, आशा गट प्रवर्तक श्रीमती. सोनाली यादव, आरोग्य सेवक श्री. इब्राहिम मकानदार, श्री. तानाजी कांबळे, श्री. सुखदेव भोसले, श्री. शामराव कांबळे, श्री. राहुल देवकाते, श्री. मझर मुलाणी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. प्रतीक लोंढे, संगणक तंत्रज्ञ श्री. अतुल तोंडे, परिचर श्री. संदीप रायपूरे, श्री. आनंद लांडगे, श्री. प्रवीण पोंदकुले, वाहनचालक श्री. शिवाजी गोळे, आशा स्वयंसेविका श्रीमती. सुवर्णा शिंदे, श्रीमती संगीता चव्हाण, श्रीमती. सुनिता वाघमारे, श्रीमती. वर्षा मुसळे, श्रीमती. पल्लवी बोराटे, श्रीमती. अश्विनी पवार, श्रीमती. वत्सला चव्हाण आणि इतर सर्व आशा स्वयंसेविका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आत्मचरित्राला उजाळा देत "बिजवडी पुस्तकांची पी. एच. सी" बनविण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.आरोग्य केंद्राच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सहसा पांढऱ्या भिंती आणि औषधांचा वास असणाऱ्या दवाखान्यात आता ज्ञानाचा सुगंध दरवळणार आहे.

## नगरमध्ये शिक्षक म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शिक्षक म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत दांपत्याची तब्बल १३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पाथर्डीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रुपेशकुमार राम बागडे (वय-३९, रा. शिक्षक कॉलनी, पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा भाऊ किरण बागडे याचा मित्र सुभाष माणिक खेडकर (रा. मालेवाडी, ता. पाथर्डी, सध्या पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर) याने सन २०२२ मध्ये त्यांच्याशी संपर्क साधून जालना येथील संत कबीर विद्यालयाशी संलग्न असलेल्या सांची प्राथमिक विद्यालय, चेतनानगर येथे शिक्षक पदाच्या जागा असल्याचे सांगितले. या जागांवर नियुक्ती करून देण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपये, अशा एकूण ३० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यानंतर खेडकर याने संस्थाचालक लिंबराज रामचंद्र जाधव (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्याशी भेट घडवून आणली. दोघांनी मिळून नोकरी निश्चित असल्याचे सांगून विश्वास संपादन केला. यानंतर रुपेशकुमार राम बागडे यांनी वेळोवेळी रोख, आरटीजीएस आणि ऑनलाईन व्यवहाराद्वारे एकूण १८ लाख ५० हजार रुपये दिले. तसेच दोघांना बनावट नियुक्ती आदेशही देण्यात आले. त्या आधारे रुपेशकुमार बागडे व त्यांच्या पत्नीने काही काळ शाळेत कामही केले. मात्र, त्यांना कोणताही पगार मिळाला नाही. दरम्यान, चौकशी केली असता संबंधित संस्थेची मान्यता शासनाने रद्द केल्याचे समोर आले. यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादी यांनी पैसे परत मागितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी!

डोंगरगाव : (स. गांवकरी)



दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी डोंगरगाव येथे हनुमान मंदिर सभागृहात महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमास गावातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डोंगरगावचे लोकनियुक्त सरपंच दशरथ माधव उगले होते. यावेळी उपसरपंच अमोल रंगनाथ उगले, ग्रामपंचायत सदस्या सौ. मनिषा सुरेश उगले, कांताबाई सुदाम माळी, ग्रामविकास अधिकारी गोडे भाऊसाहेब, ज्येष्ठ लिपिक बाळासाहेब उगले, सुनील कदम, किरण उगले, माजी सदस्य आर. के. उगले, ज्येष्ठ व्यक्तिमत्व विठ्ठल भाऊ उगले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगाव येथील मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे केली. शिवतेज प्रदीप उगले, आयुष शांताराम उगले, हिताक्षी नवनाथ उगले तसेच वीरा माधव उगले आणि सार्थक रवींद्र उगले या विद्यार्थ्यांच्या भाषणांना उपस्थितांकडून मोठी दाद मिळाली.

यावेळी अकोले येथील प्रसिद्ध व्याख्याते डॉ. नितीन आरोटे यांनी आपल्या मार्मिक व विनोदी शैलीत उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार काल, आज आणि उद्याही समाजाला दिशादर्शक ठरणार असल्याचे प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमादरम्यान डॉ. नितीन आरोटे, श्री. शिंदे सर, मुख्याध्यापिका हासे मॅडम, मुख्याध्यापक आंबरे सर आणि अविनाश उगले सर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सर्व विद्यार्थी आणि ग्रामस्थांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सर आणि माजी सदस्य आर. के. उगले यांनी केले. शेवटी सरपंच दशरथ माधव उगले यांनी सर्व मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

## 'सतत परिचर्या शिक्षण" कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

### चांगल्या नर्सिंग केअरमुळे रुग्णाचे आयुष्य वाढते आणि त्याची गुणवत्ता सुधारते : डॉ. वसंत कटारिया

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



दीर्घकालीन आजार म्हणजे मधुमेह, कर्करोग, हृदयरोग, किडनी विकार, पक्षाघात असे आजार जे महिने किंवा वर्षे चालतात. यामध्ये फक्त डॉक्टरांचे उपचार पुरेसे नसतात.रुग्णाची रोजची काळजी, औषधे, आहार, मानसिक आधार यासाठी नर्सिंगला खूप महत्त्व आहे.

दीर्घकालीन आजारात नर्स फक्त इंजेक्शन देणारी नसते तर ती रुग्णाची केअर मॅनेजर, शिक्षक आणि समुपदेशक असते.चांगल्या नर्सिंग केअरमुळे रुग्णाचे आयुष्य वाढते आणि त्याची गुणवत्ता सुधारते.असे प्रतिपादन डॉ.वसंत कटारिया यांनी केले आहे.

कल्याणरोड येथे वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग,अहिल्यानगर यांच्या वतीने आनंदऋषीजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटर व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सतत परीचर्या शिक्षण कार्यक्रम अंतर्गत "काळजीची सातत्यपूर्ण प्रक्रिया:दीर्घकालीन आजार व्यवस्थापनात प्रावीण्य मिळवणे"( "The Continuum of Care: Mastering Chronic Disease Management") या विषयावर निरंतर नर्सिंग शिक्षण (CNE) कार्यक्रमाचे उद्घाटन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे विश्वस्त व कार्डिओलॉजी विभागाचे संचालक डॉ.वसंत कटारिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत वर्धमान महावीर नॉलेज पार्कचे कॅम्पस डायरेक्टर सुनील मालू,जिल्हा रुग्णालया चे संदीप काळे,महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या वतीने निरीक्षक म्हणून श्रीमती सलोमी तेलधुने, वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग चे प्राचार्या डॉ.विद्या ठोकळ आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात सुनील मालू म्हणाले,सदर कार्यक्रमास महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची मान्यता असून सहभागी परिचारिकांना १० क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात येणार आहेत.हा उपक्रम परिचारिकांच्या कौशल्यवृद्धी व व्यावसायिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

वैद्यकीय क्षेत्रात होणारे बदल लक्षात घेऊन नवीन तंत्रज्ञान अवगत करणेसाठी सतत परीचर्या शिक्षण कार्यक्रम महत्वाचा आहे.सध्या आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अंतर्गत २ वर्षांचा ए.एन.एम.व ३ वर्षांचा जी.एन.एम.कोर्स उपलब्ध आहे.याशिवाय वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग अंतर्गत बीएससी नर्सिंग कोर्स चालू आहे.

जिल्हा रुग्णालयाचे संदीप काळे म्हणाले,दीर्घकालीन आजारात नर्सिंगचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.रुग्णांना वेळेवर औषधे देणे,इन्सुलिन देणे, बिपी-साखर तपासणे,ड्रेसिंग करणे. लक्षणांमध्ये बदल झाला तर लगेच डॉक्टरांना कळवणे. पक्षाघातानंतर चालणे-बोलणे शिकवणे,हृदयविकारानंतर व्यायामाचे नियोजन.रुग्णाला पुन्हा स्वावलंबी बनवण्यासाठी नर्सेस थेरपिस्टसोबत काम करतात.

## निर्मलनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे संविधान त्यांनी अत्यंत सखोल अभ्यास दूरदृष्टी आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने ही राज्यघटना घडवली. या संविधानामुळे भारत केवळ स्वतंत्र राष्ट्र राहिला नाही तर एक शशक्त, संघीय आणि सार्वभौम देश म्हणून जगासमोर उभा राहिला.डॉ.आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा पुरस्कार केला. त्यांनी शिक्षणाला वैयक्तिक उन्नती पुरते मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्र निर्मितीचे प्रभावी साधन मानले. असे प्रतिपादन डॉ. अनिल ससाणे यांनी केले. सावेडी उपनगरातील निर्मल नगर येथे निर्माण नगर परिसर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक यांच्यावतीने जयंती साजरी करण्यात आली यावेळी बुद्ध वंदना व भिम वंदना भाऊसाहेब देठे यांनी गायन केले. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अनिल मोहिते, बाबासाहेब सानप, रवी अनासपुरे, नगरसेवक निखिल वारे, सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, महेश तवले प्रकाश भिंगारदिवे सुशील साळवे, विकास खरात, छगन आल्हाट वैभव पोकळे, उषा साळवे, शांताबाई काळे, जयश्री साळवे, शेखर काते, संघर्ष पाचारणे, प्रा.विश्वास कांबळे, एम.बी.साळवे, एस.के. गायकवाड,अरविंद औसरमल, शशिकांत घोडके, डॉ.संगीता खंडागळे, कल्पना कांबळे, डॉ. सविता ससाणे, नलिनी गायकवाड आदींसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा.विश्वास कांबळे म्हणाले भारत जेव्हा महासत्तेकडे वाटचाल करत आहे तेव्हा या प्रवासा मागे असलेली वैचारिक शक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातच दडलेली आहे.

# पंडित दिनदयाळ उपाधयाय यांचे अंत्योदयाचा विचार ही भाजपची ओळख

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा विचार ही भाजपची ओळख आहे. या विचारधारेवर काम करणारा भाजप देशभरात तळागाळातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय घेऊन वाटचाल करीत आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी येथे केले. पक्षाची विचारधारा व कार्यसंस्कृती कार्यकर्ता केंद्रीत असल्याने प्रत्येक कार्यकर्त्याने पक्षासाठी आपल्या परीने योगदान दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

जामखेड शहर मंडल व जामखेड ग्रामीण मंडल यांच्यावतीने येथील विठाई मंगल कार्यालयात दोन दिवसीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान शिबीर नुकतेच झाले. या शिबिरात दोनही दिवस सभापती प्रा. शिंदे सक्रिय सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते उद्घाटन व समारोप झाला. यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करताना योगाचे व शारीरिक आरोग्याचे महत्त्व त्यांनी विषद केले. वैयक्तिक शिस्त व संघटनात्मक कार्यातील सातत्य यावर मार्गदर्शन केले. राष्ट्र प्रथम, मग पक्ष आणि शेवटी स्वतः असा विचार भाजप कार्यकर्त्यांमध्ये रुजलेला असतो. याच विचाराच्या आधाराने सामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत नेण्याचे काम कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी करण्याचे आवाहन त्यांनी केले. इतर पक्षांच्या कार्यपद्धतीच्या तुलनेत भारतीय जनता पक्षाची विचारधारा व कार्यसंस्कृती वेगळी आणि कार्यकर्ता केंद्रीत असल्याने पक्षात संघटनात्मक कार्याला विशेष महत्व असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत या प्रशिक्षण शिबिरात दोन दिवस विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविक भाजपशहराध्यक्षसंजय काशिद यांनी केले. प्रथम सत्रात वैचारिक अधिष्ठान या विषयावर भाजप प्रदेशाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे द्वितीय सत्रात बूथ व्यवस्थापन या विषयावर भाजप मुख्यालय प्रभारी रवि अनासपुरे यांनी मार्गदर्शन केले. तृतीय सत्रात पक्षाची कार्यपद्धती व संघटनात्मक कार्याचा विस्तार या विषयावर प्रदेश चिटणीस माजी आमदार राम सातपुते यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे नमो ॲप या विषयावर राजेश्वर श्रीराम यांनी मार्गदर्शन केले. सत्राचे पाचव्या सत्रात आपल्या सरकारची कामगिरी या विषयावर उत्तर महाराष्ट्र अभियान प्रमुख प्रदीप पेशकार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अहिल्यानगर भाजप दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनीही प्रशिक्षणार्थ्यांना संबोधित केले. सहाव्या सत्रात इतिहास व विकास या विषयावर माजी जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड यांनी मार्गदर्शन केले. .सातव्या सत्रात कार्यकर्ता कार्यपद्धती या विषयावर प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण महाअभियानाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना पक्ष विचारधारा, संघटनात्मक कार्यपद्धती, तांत्रिक साधनांचा वापर तसेच बुथ स्तरावरील नियोजन याबाबत मार्गदर्शन मिळाले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जामखेड नगराध्यक्ष सौ. प्रांजलीताई चिंतामणी,जामखेड शहर मंडलाध्यक्ष संजय काशीद,जामखेड ग्रामीण मंडलाध्यक्ष बापूसाहेब ढवळे, महिला मंडलाध्यक्ष संजीवनीताई पाटील,राज्य परिषद सदस्य मनोजकाका कुलकर्णी, नगरसेवक अमित चिंतामणीआणि सर्व नगरसेवक, तसेच छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक तसेच जामखेड शहर व ग्रामीण मधील सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आंबेडकर जयंतीनिमित्त अल्पोपहार व रोप वाटप

पुणे (स. गांवकरी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अल्पोपहार वितरण तसेच रोप वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुणे स्टेशन येथे झालेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आमदार बापूसाहेब पठारे, सभागृह नेते गणेश बिडकर, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, प्रदेश उपाध्यक्ष हुलगेश चलवादी, सरचिटणीस महिपाल वाघमारे, सरचिटणीस श्याम सदाफुले, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक नीलेश अल्हाट, जयदेव रधवे, निलेश रोकडे, चिंतामण जगताप, सनाबी शेख, हर्षदा गायकवाड, मंगल रासगे, शोभा झेंढे, हनुमंत गायकवाड, मिलिंद चलवादी, अजय थोरात, सुनिल जाधव, बुद्धिशा रंधवे, शशिकांत मोरे, शांतीनाथ चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात नागरिकांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले तसेच पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून रोपांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा समाजाने अवलंब करावा, असे आवाहन यावेळी केले.

## बोपोडीत आंबेडकर जयंतीनिमित्त ४० फूट महाबोधी विहाराची भव्य प्रतिकृती



पुणे (स. गांवकरी) : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बोपोडी येथील राजर्षी शाहू चौकात भव्य आणि आकर्षक देखावा उभारण्यात आला आहे. बोपोडी परिसरात उभारण्यात आलेली महाबोधि विहार, बोधगया येथील विहाराची तब्बल ४० फूट उंच प्रतिकृती नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. या देखाव्याचे उद्घाटन भन्ते नागघोष यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित भिक्षू संघांनी बौद्ध मंत्रोच्चार करून वातावरण भक्तिमय केले. मोठ्या संख्येने नागरिकांनी या देखाव्याला भेट देत अभिवादन केले. ही भव्य प्रतिकृती पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर आणि माजी उपमहापौर सुनीता वाडेकर यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. आकर्षक प्रकाशयोजना, देखणी सजावट आणि सूक्ष्म कलाकुसरीमुळे या प्रतिकृतीचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. उद्घाटन प्रसंगी रिपाईचे शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, नगरसेवक सनी निम्हण, सपना छाजेड, भक्ति गायकवाड आदि मान्यवर उपस्थित होते. आंबेडकर जयंतीनिमित्त बोपोडी परिसरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या भव्य देखाव्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, मागील अनेक दिवसांपासून महाबोधि विहार मुक्ती आंदोलन सुरू आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी ही भव्य प्रतिकृति उभारली आहे. तसेच या प्रतिकृतीला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजूषा नागपुरे भेट देणार असल्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले.



## पुण्यात भव्य संयुक्त अभिवादन सोहळा

पुणे (स. गांवकरी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती समिती'च्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सकाळी १० वाजता भव्य 'संयुक्त अभिवादन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येत महामानवाला अभिवादन केले. या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार चेतन तुपे आणि माजी आमदार मोहन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, गणेश बिडकर, नगरसेवक निलेश आल्हाट, ज्येष्ठ नेते बाळासाहेब जानराव, रिपाई शहराध्यक्ष संजय सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत कुंडलवार आणि समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह विविध शासकीय अधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात बँड पथकाच्या मानवंदनेने झाली. त्यानंतर बौद्ध भिक्षूंच्या उपस्थितीत सामूहिक बुद्ध वंदना व भीमस्तुती सादर करण्यात आली. शेवटी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सोहळ्यासाठी राहुल नागटिळक, विठ्ठल गायकवाड आणि समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्वायत्त, असामान्य आणि जागरूक

पुणे (स. गांवकरी) : जेन अल्फा ही डिजिटलदृष्ट्या खोलवर जोडलेली पिढी आहे, जी भारताच्या लोकसंख्येच्या चतुर्थांशाहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करते. या पिढीतील 73% मुलांकडे आधीच वैयक्तिक स्मार्टफोनची उपलब्धता आहे आणि 60% मुले लॅपटॉपचा वापर करतात. ही अशी पिढी आहे ज्यांनी तंत्रज्ञानामध्ये स्वातंत्र्याचा अनुभव घेतला आहे. जेनरेशन अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, रुकम कॅपिटलने 'जेन अल्फा डिकोडेड: द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' हा अनोखा अहवाल सादर केला आहे, जो ते ग्राहक वर्तन आणि ब्रँड एंगेजमेंट कसे नव्याने परिभाषित करत आहेत हे स्पष्ट करतो. अहवालाच्या प्रकाशनावेळी रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि मॅनेजिंग पार्टनर अर्चना जहागीरदार यांनी सांगितले: "जेन अल्फा ही भारतातील सर्वात तरुण पिढ्यांपैकी एक आहे, ज्यामध्ये घरगुती खरेदी निर्णयांपैकी 80% पर्यंत प्रभाव टाकण्याची क्षमता आहे. ते डिजिटलदृष्ट्या प्रवीण आहेत आणि कंटेंटपर्यंत अमर्याद प्रवेश आहे, तरीही अल्गोरिदम, मायक्रो-ट्रेंड्स, समवयस्क मान्यता आणि टिकाव व समावेशनासारख्या प्रारंभीच्या मूल्यांनी प्रभावित आहेत.

# स्मार्ट लाइटिंग अनुभवाचा विस्तार

- पुण्यात सिग्निफायचे दुसरे 'फिलिप्स विझ' स्टोअर सुरू;
- कनेक्टेड लाइटिंग सोल्यूशन्सचा प्रत्यक्ष अनुभव
- मोबाईल, व्हॉईस आणि ऑटोमेशनद्वारे नियंत्रणाची सुविधा



पुणे : (स. गांवकरी)

जागतिक स्तरावर अग्रगण्य लाइटिंग कंपनी सिग्निफायने पुण्यात आपले दुसरे 'फिलिप्स विझ' स्टोअर सुरू केले असून, यामुळे शहरातील ग्राहकांना अत्याधुनिक कनेक्टेड लाइटिंग सोल्यूशन्सचा अनुभव अधिक सुलभ झाला आहे. कंपनीच्या रिटेल विस्ताराच्या धोरणाचा भाग म्हणून हे स्टोअर 'लाइट आयडिया' या भागीदाराद्वारे चालवले जात आहे.

या नव्या स्टोअरमध्ये फिलिप्सच्या 'विझ' प्लॅटफॉर्मवर आधारित स्मार्ट LED लाइटिंग उत्पादने उपलब्ध असून, ग्राहकांना विविध स्मार्ट लाइटिंग तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. स्टोअरचे डिझाइन अशा प्रकारे करण्यात आले आहे की, ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात कनेक्टेड लाइटिंग कसे बदल घडवू शकते, हे सहजपणे समजू शकते.

ग्राहकांना मोबाईल ॲप, व्हॉईस असिस्टंट्स तसेच स्मार्ट स्विचेसच्या माध्यमातून लाइटिंग नियंत्रित करण्याची सुविधा मिळते. याशिवाय विविध लाइटिंग सीन, ऑटोमेशन फीचर्स आणि घरातील वेगवेगळ्या जागांसाठी वैयक्तिकृत लाइटिंग पर्यायही येथे अनुभवता येतात.

या उद्घाटनावेळी सिग्निफाय ग्रेटर इंडिया येथील स्मार्ट होम्स व्यवसायाचे कमर्शियल लीडर राजत पाहवा यांनी सांगितले की, "भारतामध्ये कनेक्टेड होम्सची लोकप्रियता वेगाने वाढत असून स्मार्ट लाइटिंग हे आधुनिक घरांचा अविभाज्य भाग बनत आहे. पुण्यातील या नव्या स्टोअरद्वारे आम्ही ग्राहकांना वापरण्यास सोपी आणि सुलभ स्मार्ट लाइटिंग सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहोत."पुणे शहरातील वाढता तंत्रज्ञानप्रेमी ग्राहकवर्ग आणि डिझाइनकडे झुकणारी जीवनशैली लक्षात घेता, कनेक्टेड लाइटिंग सोल्यूशन्ससाठी ही एक महत्त्वाची बाजारपेठ ठरत आहे. या नव्या स्टोअरच्या माध्यमातून सिग्निफायने आपल्या नाविन्यपूर्ण उत्पादनांची पोहोच अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला असून, ग्राहकांना तंत्रज्ञान, डिझाइन आणि सोयीचा संगम अनुभवता येणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनमंत्र मोलाचा : पवार

निमगाव सावा (ता. जुन्नर) : (स. गांवकरी)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा येथे उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक मा. श्री पांडुरंग पवार यांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री संदिपान पवार प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना संस्थापक मा. श्री पांडुरंग पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, विचार व कार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व देत "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा मूलमंत्र दिला. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय संविधानाच्या निर्मितीतून त्यांनी सर्व समाजघटकांना समान हक्क मिळवून दिले. तसेच त्यांनी अस्पृश्यता, अन्याय आणि विषमता याविरुद्ध लढा देत समाजाला प्रगतिचा मार्ग दाखवला. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.


# नेब्युला बाय टायटनचा अक्षय तृतीये विशेष कलेक्शन

मुंबई : (स. गांवकरी)

अक्षय तृतीयेच्या निमित्ताने नेब्युला बाय टायटनने सोन्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणारे विशेष कलेक्शन सादर केले आहे. १८ कॅरेट शुद्ध सोन्यात तयार केलेल्या या घड्याळांमधून परंपरा, उत्कृष्ट कारागिरी आणि आधुनिक डिझाइन यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो. सोनं केवळ साठवण्यापेक्षा ते अर्थपूर्णपणे वापरण्याची संकल्पना या कलेक्शनमधून अधोरेखित करण्यात आली आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक घड्याळ हे केवळ दागिना नसून आधुनिक लक्झरीचे प्रतीक आहे. अचूक अभियांत्रिकी, आकर्षक डिझाइन आणि सोन्याची अंतर्गत किंमत यांचा संगम या घड्याळांत दिसून येतो. ही घड्याळे पुढील पिढ्यांना देण्याजोगी वारसा वस्तू म्हणूनही तयार करण्यात आली आहेत. महिलांसाठी सादर केलेल्या कलेक्शनमध्ये नाजूकता आणि ठामपणाचा संतुलित संगम दिसतो. 'मल्लिगाई' या घड्याळात जास्वंद प्रेरित डिझाइन, पर्लसेंट डायल आणि रोझ गोल्ड केस यामुळे ते आकर्षक ठरते. 'वर्षा'मध्ये पावसाच्या थेंबांपासून प्रेरित कन्सेंट्रिक डायल आणि डायमंड सेट ब्रेसलेट प्रकाशाचा खेळ साकारतो. 'लोटस' या मॉडेलमध्ये फिकट निळ्या मदर-ऑफ-पर्ल डायलवर कमळाची नाजूक आकृती असून यलो गोल्ड केस आणि गडद निळा लेदर स्ट्रॅप यामुळे ते उठावदार दिसते. पुरुषांसाठीच्या कलेक्शनमध्ये अचूकता आणि रचनात्मक साधेपणावर भर देण्यात आला आहे. 'आर्ट डेको ऑटोमॅटिक' हे घड्याळ जिओमेट्रिक डिझाइन आणि स्विस ऑटोमॅटिक मूव्हमेंटसह सादर करण्यात आले आहे. 'जेनेसिस ऑटोमॅटिक'मध्ये गिलॉशे डायल, डोडेकॅगोनल बेजल आणि विशेष रोटरमुळे वेगळेपण जाणवते.

# एथरतर्फे एक्सपीरियन्स सेंटर्स विस्ताराची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)



भारतातील आघाडीच्या विद्युत दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये देशभरातील आपले विक्री जाळे दुप्पट करत ७०० एक्सपीरियन्स सेंटर्सचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठल्याची घोषणा केली आहे. मागील वर्षभरात कंपनीने ३५० हून अधिक नवीन केंद्रे सुरू केली असून, ३१ मार्च २०२५ रोजी असलेल्या ३५१ केंद्रांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ आहे. या विस्तारामुळे ग्राहकांपर्यंत पोहोच वाढून विद्यमान तसेच नव्या बाजारपेठांमध्ये कंपनीला वेगाने विस्तार साधता आला आहे. वाहन नोंदणीच्या आकडेवारीनुसार, मार्च २०२६ मध्ये एथरचा राष्ट्रीय बाजारहिस्सा १८.७ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, ही वाढ प्रामुख्याने कंपनीच्या पहिल्या कुटुंबीय वापरासाठीच्या 'एथर रिट्झा' या स्कूटरच्या यशामुळे झाली आहे; सादरीकरणापासून या स्कूटरच्या २.८ लाखांहून अधिक युनिट्सची विक्री झाली आहे, तर 'एथर ४५०'कार्यक्षमतेवर आधारित मालिकेलाही सातत्याने मागणी मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीने मध्य भारत तसेच देशातील इतर प्रदेशांमध्ये धोरणात्मक विस्तारावर विशेष भर दिल्यामुळे या भागांमध्ये बाजारहिस्स्यात जवळपास दुप्पट वाढ नोंदविण्यात आली आहे, तसेच दक्षिण भारतातील उपस्थिती अधिक मजबूत करत दुसऱ्या आणि तिसऱ्या स्तरातील शहरांमध्येही विस्तार साधण्यात आला आहे. या यशाबद्दल बोलताना एथर एनर्जीचे मुख्य व्यवसाय अधिकारी रवनीत सिंह फोकेला म्हणाले की, विक्री जाळ्याच्या विस्तारामुळे नव्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये आणि ग्राहक गटांमध्ये पोहोच वाढून विक्री व बाजारहिस्स्यात भक्कम वाढ झाली असून, आगामी तिमाहींमध्येही ही वाढ कायम ठेवण्याचा कंपनीचा मानस आहे. विक्री जाळ्याबरोबरच ग्राहकांना अखंड मालकीचा अनुभव देण्यासाठी एथरने देशभरात ५०० अधिकृत सेवा केंद्रांचा टप्पा गाठला आहे, तसेच 'एथर ग्रिड' या देशातील सर्वात मोठ्या दुचाकी जलद-चार्जिंग जाळ्याचा विस्तार ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ४,३५७ चार्जिंग बिंदूपर्यंत करण्यात आला आहे, ज्यामुळे वाहनचालकांना अधिक सोयीस्कर आणि सुलभ चार्जिंग सुविधा उपलब्ध झाली आहे.

# जीई एरोस्पेसने करारावर केली स्वाक्षरी

नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)

जीई एरोस्पेसने आज भारतीय हवाई दलासोबत (आयएएफ) करार जाहीर केला आहे. या करारांतर्गत, हवाई दलाच्या तेजस या हलक्या लढाऊ विमान (एलसीए) ताफ्याला शक्ती देणाऱ्या F404 -IN20 इंजिनांसाठी भारतात डेपो सुविधा स्थापन केली जाणार आहे. ही सुविधा भारतीय हवाई दलाद्वारे उभारली जाईल, ज्यासाठी जीई एरोस्पेस तांत्रिक मदत पुरवणार आहे. यामुळे भारताच्या स्वदेशी संरक्षण देखभाल प्रयत्नांना मोठी मदत मिळण्याची अपेक्षा आहे. ही सुविधा कार्यान्वित झाली की, दुरुस्तीसाठी परदेशातील केंद्रांवर अवलंबून राहण्याची गरज उरणार नाही, ज्यामुळे दुरुस्तीचा लागणारा वेळ लक्षणीयरित्या कमी होईल. या डेपो सुविधेची मालकी, संचालन आणि देखभाल भारतीय हवाई दलाकडे असेल, तर जीई एरोस्पेस तांत्रिक माहिती, प्रशिक्षण, सहाय्यक कर्मचारी आणि आवश्यक सुटे भाग व विशेष उपकरणांचा पुरवठा करेल.

# फटाकपेची 'प्रीमियर लीग' रेफरल मोहीम सुरू

मुंबई : (स. गांवकरी)




फिनटेक क्षेत्रातील फटाकपेने क्रिकेट हंगामाच्या पार्श्वभूमीवर 'फटाकपे प्रीमियर लीग' (एफपीएल) ही विशेष रेफरल मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत सहभागी होणाऱ्या वापरकर्त्यांना खात्रीशीर डिजिटल सुवर्ण रिवॉर्ड मिळण्याबरोबरच डिजिटल गोल्ड, टेलिव्हिजन संच आणि स्कूटरसारखी उच्च-मूल्य बक्षिसे जिंकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या मोहिमेचा एकूण बक्षीस निधी ₹१५ लाखांपर्यंत असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे.

इंडियन प्रीमियर लीगच्या उत्साहाला जोड देत ही मोहीम २८ मार्च ते ३१ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. क्रिकेटच्या जोशासोबत आर्थिक फायद्याची सांगड घालणारी ही मोहीम वापरकर्त्यांना मित्र व कुटुंबीयांना फटाकपेवर रेफर करण्यास प्रोत्साहित करते. संबंधित व्यक्तीने फटाकपेवर साइन अप करून इन्स्टंट लोन घेणे किंवा 'फटाक उडान' हे उत्पादन सक्रिय करणे आवश्यक आहे. रेफर केलेल्या वापरकर्त्याने कर्ज वितरण प्रक्रिया पूर्ण केली किंवा 'फटाक उडान' सक्रिय केले की तो रेफरल यशस्वी मानला जाणार आहे. प्रत्येक यशस्वी रेफरलला 'रन' म्हणून गणले जाईल. या मोहिमेत वापरकर्त्यांना ठरावीक टप्पे पूर्ण केल्यानंतर खात्रीशीर बक्षिसे देण्यात येणार आहेत. दोन यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹१०० किमतीचे डिजिटल सोने, चार यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹५०० किमतीचे बक्षीस, तर सहा यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹१००० किमतीचे बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय, चार आणि सहा यशस्वी रेफरल्सचा टप्पा पार करणारे वापरकर्ते लकी ड्रॉसाठी पात्र ठरणार आहेत. या लकी ड्रॉमधून पाच ३२-इंच टीव्ही संच तसेच टीव्हीएस एनटॉर्क स्कूटर जिंकण्याची संधी मिळणार आहे. कंपनीच्या माहितीनुसार, एक लाख एकूण रेफरल अर्जांचा टप्पा पूर्ण झाल्यानंतरच स्कूटरचे बक्षीस अनलॉक होणार असून त्यामुळे हा समुदायाच्या सहभागावर आधारित महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. फटाकपेचे मुख्य व्यवसाय अधिकारी अभिषेक गांधी म्हणाले, "फटाकपे प्रीमियर लीग भारतातील सर्वात मोठ्या क्रिकेट हंगामाची ऊर्जा आणि सांस्कृतिक गती वापरून रेफरल प्रक्रियेला अधिक उत्साही आणि फायद्याचा अनुभव बनवते. प्रत्येक यशस्वी रेफरल हा सीमारेषा पार केल्यासारखा वाटावा, अशी आमची संकल्पना आहे. आमचे वापरकर्ते त्यांच्या आर्थिक गरजांसाठी फटाकपेची निवड करतातच, पण मित्र-परिवारातही आमच्यावर विश्वास ठेवतात.

त्या विश्वासाची दखल घेण्याचा हा आमचा प्रयत्न आहे." कंपनीच्या म्हणण्यानुसार, या मोहिमेमुळे वापरकर्त्यांना डिजिटल गोल्डच्या स्वरूपात खात्रीशीर कमाईची संधी, उच्च-मूल्य बक्षिसे जिंकण्याची शक्यता आणि सोपी रेफरल-आधारित सहभाग प्रक्रिया अशा अनेक स्तरांवर लाभ मिळणार आहेत. त्याचबरोबर, सहभागी वापरकर्ते त्यांच्या ओळखीच्या लोकांना आर्थिक सेवांपर्यंत पोहोचण्यास मदत करू शकणार आहेत.

# भारतीय लष्कराने सिक्कीममधील पर्यटकांची केली सुटका

पुणे : (स. गांवकरी)




भारतीय लष्कराने, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन (बीआरओ) आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने, ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत उत्तर सिक्कीममध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. तारामचूच्या पुढे भूस्खलनामुळे रस्त्याचा एक महत्त्वाचा भाग कोसळल्याने, चट्टनकडे जाणारा मार्ग बंद झाला आणि शेकडो पर्यटक अडकून पडले. त्यानंतर हे ऑपरेशन सुरू करण्यात आले. भारतीय लष्कराचे अभियंते त्रिशक्ती सॅपर्स तात्काळ कामाला लागले आणि त्यांनी रस्त्याची दुरुस्ती सुरू केली. या ऑपरेशनमधील एक महत्त्वाचे यश म्हणजे तुटलेल्या रस्त्यावर एका तात्पुरत्या पादचारी पुलाचे वेगाने बांधकाम करणे, ज्यामुळे कठीण हवामान आणि भूभाग असूनही लोकांना सुरक्षितपणे बाहेर पडणे शक्य झाले. याव्यतिरिक्त, पथकांनी डोंक्याला पास येथील दाट बर्फ देखील हटवला, ज्यामुळे मार्ग खुला राहिला आणि बचावकार्य सुरू राहिले. सर्व पथकांमधील काळजीपूर्वक नियोजन आणि समन्वयामुळे, एकूण १,१७० पर्यटक आणि ७० मोटारसायकलींना कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. या मोहिमेने हे सिद्ध केले आहे की भारतीय लष्कर कठीण काळात लोकांना मदत करण्यासाठी नेहमीच तयार असते.

# वनप्लस सर्व्हिस नेटवर्क आता 600+ ओप्पो सर्व्हिस सेंटर्समध्ये उपलब्ध

ONEPLUS

मुंबई : (स. गांवकरी)

वनप्लस इंडियाने आज जाहीर केले की त्यांचे विस्तारित आफ्टर-सेल्स सर्व्हिस नेटवर्क आता देशभरात सुरू झाले आहे. यामुळे ग्राहकांना भारतातील 600+ ओप्पो इंडिया सर्व्हिस सेंटर्समध्ये सपोर्ट मिळू शकतो. या उपक्रमामुळे सेवा उपलब्धता अधिक सुलभ झाली असून, विशेषतः मेट्रो शहरांबाहेरील ग्राहकांनाही जवळच्या सर्व्हिस सेंटरमध्ये मदत मिळणार आहे. मागील घोषणेवर आधारित, या रोलआउटमुळे आफ्टर-सेल्स सर्व्हिस अधिक सुलभ झाली आहे. ग्राहकांना आता विस्तारित सर्व्हिस नेटवर्कद्वारे सोयीस्करपणे सपोर्ट मिळू शकतो. वनप्लसचे सर्व्हिस स्टँडर्ड्स कायम राहतील – यात जलद प्रतिसाद देण्याचे वचन, ओरिजिनल स्पेअर पार्ट्सचा वापर आणि प्रशिक्षित तंत्रज्ञांकडून मिळणारी मदत यांचा समावेश आहे. ही घोषणा वनप्लस सर्व्हिस देशभरात मोठ्या प्रमाणावर अधिक सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. आता ग्राहकांना भारतभरातील अधिकृत सर्व्हिस सेंटर्समध्ये भेट देऊन सपोर्ट मिळू शकतो.

# 'भागूबाई'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

मुंबई : (स. गांवकरी)



मराठी चित्रपटसृष्टीतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री निर्मिती सावंत पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. 'भागूबाई' या चित्रपटात त्या मुख्य भूमिकेत दिसणार असून आज या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ग्रामीण महाराष्ट्राच्या रंगतदार पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट २४ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत 'भागूबाई' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये 'भागूबाई' या खट्याळ, बिनधास्त आणि गप्पिष्ट बाईची मजेशीर दुनिया पाहायला मिळते. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये नाक खुपसत ती गावात गोंधळ माजवते आणि साध्या घटनांना मोठं रूप देत नात्यांमध्ये गैरसमज निर्माण करते. पण या सगळ्या विनोदामागे एक गंभीर सत्य दडलेलं असल्याची झलकही ट्रेलरमध्ये दिसते. या चित्रपटाचा गाभा म्हणजे निर्मिती सावंत यांची मुख्य भूमिका. त्यांच्या खास कॉमिक टायमिंगसोबतच भावनिक अभिनयाची झलक यात पाहायला मिळते. 'सुपर डुपर' मधील यशानंतर त्या पुन्हा एकदा प्रेक्षकांना आपलंसं वाटेल अशी, मातीशी जोडलेली व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहेत. चित्रपटात भार्गवी चिरमुले, शशांक शेंडे, मंगेश देसाई, विजय पाटकर, नागेश भोंसले आणि निखिल चव्हाण यांचा दमदार अभिनय पाहायला मिळणार आहे. भागुबाई चित्रपटाची कथा एका अशा बाई भोवती फिरते, जिला गावातल्या गप्पा आणि कुचाळक्या करण्यात विशेष आनंद मिळतो. मात्र तिच्या आयुष्यात घडणारी एक अनपेक्षित घटना सगळंच चित्र बदलून टाकते. त्या घटनेनंतर तिच्या आयुष्यात आणि गावात काय बदल होतात हे या चित्रपटात पाहायला मिळेल. या चित्रपटाचे दिग्दर्शन संजय अमर यांनी केलेलं असून वास्तवाशी जोडलेली आणि भावनिक स्पर्श असलेली ही कथा प्रेक्षकांना नक्कीच भावेल, तर निर्माती श्रद्धा पटेल यांनी ही कथा प्रेक्षकांपर्यंत भावनिक पद्धतीने पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. हास्य, नाती आणि लपलेलं सत्य यांचा सुरेख मेळ साधणारा 'भागूबाई' हा चित्रपट एक वेगळा आणि मनोरंजक अनुभव देण्याचं आश्वासन देतो. 'भागूबाई'चा ट्रेलर पाहा आणि तिच्या दुनियेत रमून जा!